नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

एप्रिल मे जून १९९५

194, नविन रामदासपेठ
नागपूर - 10



शिवा राऊत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आवाहन

मराठीतील दर्जेदार नियतकालिकांच्या दुरावस्थेची समस्या गेल्या काही वर्षांपासून विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र 'युगवाणी'च्या संघटित प्रयत्नानंतर मराठी वाङ्मयीन संस्कृतीतील एक सर्वाधिक अग्रक्रमाची समस्या म्हणून आता पुरेशी जाणवू लागली आहे.
मात्र त्यावरील तोडगा, उपाययोजना व त्याकरता आवश्यक त्या सामूहिक कृतीकरता पुरेशी इच्छाशक्ती अद्यापही अभावानेच आढळते. विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाने मराठीतील पहिलीवहिली नियतकालिक विकास परिषद घेऊन त्याद्वारे केवळ युगवाणीच नव्हे तर तमाम सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांच्या उपजीविकेच्या समस्यांची शासनाने दखल घेतली. त्याबाबत एक समिती नियुक्त करून त्यावर विचारही केलेला असून समितीने मांडलेल्या सूचनांची स्वीकृती व अंमलबजावणी याबाबत मात्र अद्याप कोणताच निर्णय घेतलेला नाही. तो जसा जलद घ्यावा अशी मागणी सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांकडून होणे आवश्यकही आहे. दुसरी वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद शासनाच्या या संबंधातील निर्णयानंतरच आयोजित करावी असा मानस असल्याने त्या संदर्भातही पुढील हालचाल तूर्तास स्थगित आहे. दरम्यान पहिल्या वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेने सुचविल्याप्रमाणे प्रत्येक वाङ्मयीन नियतकालिकांनी आपआपला स्थायी निधी उभारण्याच्या सूचनेची अंमलबजावणी विदर्भ साहित्य संघाने करावी असे कार्यकारिणीने ठरविले असून 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघाच्या नियतकालिकाने आपला स्वतःचा स्थायी निधी उभारावा या हेतूने सर्व वाचक, वर्गणीदार, संस्था, व्यक्ती व वाङ्मयप्रेमी यांना हे आवाहन करण्यात येत आहे.
'युगवाणी' या नियतकालिकाला पुढेही स्थिर पायावर कायम उभे राहता यावे याकरता एक 'स्थायी निधी' उभारण्याचे ठरविण्यात आले असून त्यास सर्व संबंधितांनी सढळ हाताने मदत करावी व ही वाङ्मयीन संस्कृती कायम राखण्यास, अधिक समृद्ध करण्यास सहकार्य करावे ही विनंती आहे. या निधीत रुपये पाचशे व अधिक रक्कम जमा करणाऱ्यास 'युगवाणी'चा अंक आजीव प्राप्त होत राहील. 'युगवाणी'चा स्थायी निधी हा मराठी वाङ्मयीन संस्कृती टिकवून धरण्याच्या कार्यातील एक सर्वाधिक महत्त्वपूर्ण दुवा समजून समस्त वाङ्मयप्रेमी यथाशक्ती सहकार्य करतीलच या विश्वासासह हे आवाहन!

संपादक/प्रकाशक
'युगवाणी'
विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

●●

टीप : निधीची रक्कम चेक/ड्राफ्टने 'सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ' या नावे कृपया **'युगवाणी स्थायी निधीकरता'** असे नमूद करून पाठवावी ही विनंती.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. भाऊजी दप्तरी
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

युगवाणी

संपादक : वामन तेलंग

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन, संवर्धन-संशोधन ॥

कार्यकारी संपादक डॉ. ज्योती लांजेवार

संपादक मंडळ डॉ. म. शं. वाबगावकर/डॉ. भाऊ लोखंडे/डॉ. विजया डबीर/डॉ. सुलभा हेर्लेकर

वर्ष एकावनावे/अंक ५१-१ ते ३ एप्रिल-मे-जून १९९५.

मूल्य १० रु./वार्षिक वर्गणी ५० रु. ■ त्रैवार्षिक वर्गणी १२५ रु.

अनुक्रम

■ संपादकीय : निरोपाचे / वामन तेलंग . . २ ■ कविता १३ - २३ ■ महेश एलकुंचवार यांचे ललित गद्य : एक आत्मशोध [लेख] : डॉ. आशा सावदेकर . . २४ ■ केंद्रीय कार्यवृत्त : मनोहर म्हैसाळकर ३८

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त.
या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

■ मुखपृष्ठ संकल्पन : श्वेता वनहट्टी
शीर्षक : 'श्रद्धांजली'

■ आतील चित्रे : श्रीधर अंभोरे/भ. मा. परसवाळे/सुभाष शर्मा/प्रकाश कामतीकर

■ संपादकीय पत्रव्यवहार : संपादक, युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / भाष : ५२३९२९

■ प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२.

■ मुद्रक : मधुसूदन पांडुरंग वनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १२.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

शिवाजी रोडबाजी राऊत

शिवाजी रोडबाजी राऊत हे त्याचे पूर्ण नांव, पण विदर्भाच्या कवितेच्या क्षेत्रात तो शिवा राऊत याच नावाचे ओळखला जायचा. तसा त्याचा संचार इथे, तिथे सर्वत्र असायचा. इथे, तिथे म्हणजे विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनांमध्ये, जनवादी साहित्याच्या गोटामध्ये, ग्रामीण साहित्याच्या मेळाव्यांमध्ये, प्रादेशिक संमेलनांमध्ये, तर क्वचित अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये सुद्धा! कवी म्हणून तो या सर्वांना 'आपला' वाटायचा. वास्तविक 'आपला वाटावा' असे त्याचे व्यक्तित्व नव्हते. असणार करो? यवतमाळ जिल्ह्यातील दिघी बेंभळा ह्या एका कोपऱ्यातल्या गावी तो असायचा. महाराष्ट्राच्याच कशाला, पण विदर्भाच्याही नकाशात दिघी-बेंभळा हे खेडे शोधून पाहिले तर बेंभळा नावाची नदी आधी दिसेल आणि मग दिघी हे बारकेसे गाव! तो यवतमाळ जिल्ह्यातला की अमरावती, हेसुद्धा निश्चितपणे त्याच्या मित्रांनाही सांगता यायचे नाही. श्री. नारायणराव राऊत हे त्याचे काका. त्यांचे एक पत्र माझ्याकडे आहे आणि वेणी-गणेशपूर असे गावाचे नाव त्यावर नोंदले आहे. पत्राच्या खाली टीप आहे : अमरावती-मंगरूळ चव्हाळा बसेस सुरू आहेत. त्याचा अर्थ असा की, शिवा राऊतचे मूळ गाव वेणी- गणेशपूर हे असावे आणि ते अमरावती जिल्ह्यात नोंदले असावे. कदाचित यवतमाळ आणि अमरावती या जिल्ह्यांच्या सीमारेषेवर शिवाचे हे गाव असावे. चेहरा-मोहरा नसलेले.... तरीही शिवा विदर्भातल्या सर्व कवींना 'आपला' वाटायचा. ग्रामीण भागात कुठेतरी तो प्राथमिक शिक्षक होता आणि शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व ते काय असणार! पायजमा आणि लांब बाह्यांचा शर्ट असा त्याचा ठरून गेलेला पोशाख. तोही बहुधा मळलेला. कुणी तरी सांगत होते की, एखादा मित्रच त्याला पायजमा-सदरा शिवून द्यायचा. तेवढ्यापुरते त्याचे कपडे पांढरेही दिसायचे. एरवी सारा गबाळा कारभार.... शिवाला त्याचे तसे अप्रूप नसायचे आणि भानही नसायचे. सांगायचा मुद्दा हा की, जेणेकरून उठावदार वाटावे, आकर्षक वाटावे असे वरवर त्याच्या व्यक्तित्वात काहीही नव्हते. पण त्याची कविता.... ती लखलखीत होती आणि त्याच्या डोळ्यात कवित्वाचा भाव नेहमीसाठी मुक्कामाला असायचा. भल्याभल्यांनी हेवा करावा असे कवित्वाचे दान त्याच्या पदरात निसर्गाने टाकले होते आणि विदर्भाच्या कवितेच्या क्षेत्राला ती खूणगाठ पटली होती.

शिवा राऊतचा संचार जरी कवितेच्या सर्व गोटांमध्ये असला तरी त्याचे कवितालेखन त्यापैकी कोणाच्याच सुरांशी जुळणारे नव्हते. गोटागोटांचे कंठाळी कण्हणेही त्याला मान्य नव्हते. दलित, जनवादी, ग्रामीण, पुरोगामी, प्रस्थापित असा किंवा ह्यासारखा काव्य-पंगती-प्रपंचच शिवाला मंजूर नव्हता. त्याची कविता वेगळी आहे आणि त्याचबरोबर ती सशक्तही आहे हे मनोमन संबंधित साहित्य-प्रवाहांनीही ओळखले होते. त्यांची अडचण फक्त एवढीच होती की, प्रस्थापित / पारंपारिक / प्रतिक्रांतिकारी अन् तत्सम विशेषणे लावून त्यांना शिवा राऊतला प्रवाहबाह्यही करता येत नव्हते.... शिवाला त्या कशाचीच पर्वा नव्हती, त्याला कवितेने केव्हाच झपाटले होते व ती धुंदी त्याला पुरेशी होती. शिवाय सामान्यतः अप्राप्य अशा हृदयांतून त्याच्या कवितेला प्रतिसादही मिळत होता.

एक प्रसंग नोंदवण्यासारखा आहे. चंद्रपूरला साहित्य संमेलन होते. श्री. सुरेश द्वादशीवार यांनी त्या संमेलनात शिवाला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पुढ्यात आणून उभे केले. माध्यान्हाची वेळ आणि चंद्रपूरचा उन्हाळा. एका झाडाखाली तर्कतीर्थ उभे. शिवा त्यांना आपल्या कविता ऐकवू लागला..... तब्बल दीड-दोन तास कवितेचा हा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संवाद सुरू होता. ओसरत्या वयातही तर्कतीर्थांना वाटत नव्हते की या संवादात खंड पडावा!!

अभंग, ओवी अशी अक्षरवृत्ते घेऊन शिवाची कविता आकार घेत असे. आजच्या काळातील नामवंत आणि नव्या कवींनी कवितेमधील अंतर्गत लय, गेयता आणि अक्षरवृत्ते यांचेकडे जवळपास पाठच फिरविलेली दिसेल. परिवर्तनवादी, व्यवस्थाविरोधी अशा सामाजिक मूल्यांशी मराठी कवितेने आपले नाते केव्हाच जोडून घेतले आहे आणि स्वाभाविकपणेच गेय वा वृत्तप्रधान कविता मागे सारली आहे. त्याचा एक परिणाम असा की, पलिते घेऊनच कवितालेखन करावे लागत असते असा गोड समज नवोदित कवींनी करून घेतलेला दिसतो. मर्ढेकरांच्या काळात आणि त्यांच्या नंतरच्या काळात 'नवी कविता' ह्या विरुदाखाली कवितेच्या क्षेत्रात जो पसारा मांडला गेला होता, तशाचसारखा हाही प्रकार झाला आहे. शेवटी अस्सल तेच टिकत असल्याने त्याबाबत तशी काळजी करण्याचे कारण नाही, हा भाग वेगळा. परंतु हे बाकी खरेच आहे की, कलाक्षेत्रामध्ये 'सामाजिकता' या मूल्याचा आज बोलबाला आहे आणि नवोदित वर्ग ते वळण घोटू लागला आहे. आश्चर्य याचेच वाटते की, शिवा राऊत त्या वळणाने गेलाच कसा नाही? त्याचा 'अक्षर उत्सव' हा एक कविता-संग्रह प्रकाशित झालेला आहे. एकूण छ्यांशी कविता ह्या संग्रहात समाविष्ट आहेत. आणखी जवळपास दीडशे ते दोनशे कविता तरी असंग्रहित स्वरूपात असतील. त्यातल्या बहुतांश कविता वेगवेगळ्या नियतकालिकांतून आणि प्रामुख्याने वृत्तपत्रांच्या रविवार-पुरवण्या व दिवाळी आदी विशेष अंकांतून प्रसिद्ध झालेल्या असाव्यात. अप्रकाशित कविता नक्की किती असतील याचा अंदाज बांधणे जरा कठीणच. कारण आर्थिक ओढगस्तीमुळे त्याचा मुक्काम बरेचदा या वा त्या मित्राकडे, परिचिताकडे असायचा. कधी दोन, कधी चार तर कधी आठ-आठ दिवस शिवा दिघीबाहेर असायचा. त्याचे पाडाव ठिकठिकाणी पडायचे. अशा वेळी झालेले कविता-लेखन तो त्या त्या पडावाच्या यजमान-मित्राच्या स्वाधीन करायचा. नागपूर आकाशवाणीवरील श्री. बबन नाखले, आर्णीचे गझल-गायक श्री. सुधाकर कदम, सुप्रसिद्ध कवी नारायण कुळकर्णी कवठेकर, नागपूरचे श्री. जगन वंजारी, यवतमाळचे गजेश तोंडरे इत्यादी अनेकांकडे त्याच्या कविता आजही असतील-आहेत. त्यातल्या काही प्रसिद्ध झालेल्या आहेत, तर काही अप्रसिद्ध आहेत. आर्णीचे श्री. सुधाकर कदम यांनी आपल्याकडील शिवाच्या जवळपास पाऊणशे कवितांचे बाड विदर्भ साहित्य संघाच्या स्वाधीन केले आहे. सौ. सविता सुनील चौधरी ह्यांनी शिवाच्या कवितांच्या पाच वह्या आणून दिल्या. शिवाची ती मुलगी. वर्धेला असते. तिच्याकडील मुक्कामात शिवा आपल्या कवितांची नोंद वह्यांमध्ये करून ठेवत असला पाहिजे. आपल्या या मुलीवर त्याचा लोभ असला पाहिजे, जीव असला पाहिजे. कदाचित असेही असेल की, तिच्या घराचा त्याला फार मोठा आधार वाटत असावा.... कवितेच्या क्षेत्रात त्याची काही श्रद्धास्थाने असणारच, पण त्याने आपला पहिला कवितासंग्रह वात्सल्यपूर्वक अर्पण केला आहे तो सौ. सविताला! तेवढाच बहुधा त्याचा कौटुंबिक आगापिछा असावा आणि अर्थातच कविता हे मागे सोडलेले धन!.... नकाशावरही सापडणार नाही अशा अनाम खेडेगावचा हा शिवाजी रोडबाजी राऊत. वय असेल चाळीस-पंचेचाळीसचे. किरकोळ देहयष्टी. वऱ्हाडच्या मातीसारखाच मऊशार काळा सतेज रंग. उठून दिसावेत असे भावदर्शी डोळे आणि त्यात सतत तरंगणारी कवितेची झाक! कविसंमेलनांमध्ये आवर्जून त्याची उपस्थिती असायची. त्या व्यासपीठीय राग-रंगात आपली कविता दडपली जाते याची खंत त्याला संत्रस्त करायची. पण संमेलनातच कुठे एखाद्या झाडाखाली, कुठे प्रतिनिधींच्या निवासस्थानी, कुठे शाळेच्या व्हरांड्यात, तर कुठे भोजनोत्तर भोजनमंडपातच काही जाणत्यांच्या कोंडाळ्यात त्याची कविता स्वतंत्रपणे पुढे यायची आणि हमखास दाद घेऊन जायची. त्याच्या जिवाची अन् जगण्याची ओढाताणही त्या निमित्ताने कदाचित सैलावत असेल. त्यामुळेही, व्यासपीठीय कंठाळ्यात आपली कविता हमखास पडते याची खंत असूनही शिवा संमेलनास हजेरी लावायचाच. पण आता तेही पर्व संपले आहे. दिनांक ८ एप्रिल १९९५ रोजी शिवा राऊत अचानकच सगळ्याच मैफिली मागे टाकून गेला आहे. त्या दिवशी दुपारी १२ वाजता त्याला देवाज्ञा झाली. काका श्री. नारायणराव राऊत यांनीच त्याचे अंतिम संस्कार केले. शनिवार - दुर्गाष्टमीचा मुहूर्त शिवाने धरला. वेणी-गणेशपुराहून त्याच्या निधनाची बातमी यायलाच दोन दिवस लागले!!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ २ ॥

ये सावळ माये
पान्हारून ये
मना दयाघना
तान्हारून ये

आभाळ दूरस्थ
पाहुण्या, ये जरा
केस-मोकळ-वेण्या
बांध जरा

इन्द्रधनुस बांधू
श्रावण झुले
तुझ्या आपाढास्तव
देह उले

खळाळपाणी थेंबून
भाराळ डोळी
शैल विराग अपर्णे
दुःखे चन्द्रमोळी

जाऊ नको शीव सोडून
इथे अडकून दिंडी
भाव अद्वैतातला
भारास्तव पाखंडी

(गजेश तोंडरे, यवतमाळ यांच्या संग्रहातून)

शिवा राऊतची ही एक कविता : अभंग आणि ओवी ही वृत्ते ज्या चिद्‌विलासातून झंकृत होत मराठीमध्ये संतांनी स्थिरपद केली थेट त्या अमूर्त विलासाशी शिवा राऊत आपल्या कवितेची नाळ वांधतो. कवितेची लय, आशयाची झेप, कवितागत भावावस्थेची एकूण ठेवण आणि तिची आसनमांडी, शब्दांची अर्थकुळी व त्यांचा साज एका अरूपाचे रूप गोंजारत त्याच्या कवितेमधून वावरत असते. शिवा राऊतची पार्श्वभूमी वर सविस्तरपणे चितारण्याचा मी प्रयत्न केला आहे. शिवा कोणत्याही अर्थाने टाळकुट्या नव्हता. त्याच्या डोळ्यांमध्ये तरळणारी एक झाक सोडली तर व्यावहारिक पातळीवरच त्याचा जीवनक्रम चालत असे. आवड-निवड, रुची-अरुची, प्रसिद्धी-अप्रसिद्धी, जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी, लहान-मोठ्या लांड्या-लबाड्या, अशा प्रकारचेच चार-चौघांसारखे जीवन तो जगत असे. त्याच्या कुटुंबात कुणी संत-महंत होऊन गेल्याचीही वार्ता नाही. ज्याला शेवटी फाटकेच म्हणावे लागेल असे आयुष्य त्याच्या वाट्याला आले होते. त्यात कोणत्याही अर्थी 'दिव्यत्वाच्या भासांना' जागा नव्हती. थोडक्यात म्हणजे 'भावभक्तीने विभोर' वगैरे सारखे त्याचे जगणे नव्हते, त्याचे आयुष्य नव्हते. त्याची ग्रामीण आणि अभावग्रस्त पार्श्वभूमी लक्षात घेतली तर त्याने विद्रोहाचीच कविता लिहिणे आणि समांतर व्यासपीठ भूपविणे अधिक तर्कसंगत होते. परंतु कवितेतून उमटतो तो अगदीच वेगळा शिवा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ओठी अवसेचा
अळुमाळु स्तन
आगळी तहान
        भागवेन

सारेन स्वप्नांनी
चांदण्यांची साय
तुझा अंतराय
        आठवेन

हळूच सोलेन
पुनवेचा गाभा
तुझी-माझी आभा
        व्हाया एक

(अक्षर-उत्सव/आभा/पृष्ठ ६९)

शब्दांच्या चौकटीत बांधता येणार नाहीत अशासारखे विलक्षण अनुभव घेऊन शिवा राऊतची कविता समोर येते. त्याची 'देवलग्न' ही कविता त्यादृष्टीने अधिक बोलकी आहे. पहा -

देवलग्न झाले बाई देवलग्न झाले
घाल आता अहेवाची कृष्णकर्णफुले

तुला कालिंदीला त्याची नीलवस्त्रआभा
देहउण्या गेही आली घनःश्यामशोभा

माये तुझे हळदीचे हात पंचारती
आणि डोळा गौराई गे चंद्रसूर्य न्हाती

चंदनाच्या बाहुलीशा सर्वसाक्ष मुली
विराटाचे अंग तुला चैतन्याची धाली

देवलग्न झाले बाई देवलग्न झाले -
अनासाच्या पोटी तुझ्या उभे विश्व हाले

ओघात ह्याच ठिकाणी कै. मधुकर केचे यांच्या अशाचसारख्या कवितेचा उल्लेख केला पाहिने. दिंडी गेली पुढे, पुनवेचा थेंब आदी केच्यांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. सत्यकथा, छंद, अभिरुची ह्या वाङ्मयीन नियतकालिकांच्या बहराचा तो काळ. मराठी कवितेचे विश्व मर्ढेकर, कवि अनिल, पुरु शिव रेगे, इंदिरा संत, दिलीप चित्रे, ग्रेस, मंगेश पाडगावकर प्रभृती मान्यवरांनी भारलेले. दुसऱ्या बाजूने शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता ताठपणे उभी. अशा काळात मधुकर केचे यांचा अभंग लक्षणीय ठरला होता. येथे केच्यांचे स्मरण होण्याचे कारण असे की, नादवत्या लयीची केच्यांची एक कविता आहे-

एक रंग झेलू बाई दोन रंग झेलू....
श्रीरंगच झेलू जाता देह कसा तोलू.....

शिवा राऊतच्या 'देवलग्न' ह्या उपरोक्त कवितेचा पोतही थेट केच्यांच्याच कवितेसारखा आहे. तीच लय, तोच ठेका आणि अगदी समांतर जाणारी अभिव्यक्ती व आशय! केचे वेगळ्या पिढीचे कवी, अन् शिवा राऊत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अगदी काल-परवाचा. कवितांतर्गत लयीवर घट्ट पकड ठेवून नादावणाऱ्या, खुळावणाऱ्या शब्दांना वाकवणारे केचे-शिवासारखे बरेच कवी विदर्भात आहेत. ग्रेस आणि सुरेश भट ही नावे महाराष्ट्रात सर्वांनाच माहीत आहेत. परंतु शब्दकळेमध्ये त्यांना हार न जाणारी लाखपुरीचे कै. उ. रा. गिरी, बुलढाण्याचे अरविंद देशपांडे, अमरावती जिल्ह्यातला ललित सोनोने अशी आणखीही काही नावे येथे सहज सांगता येतील. विदर्भातल्या या सर्व कवींचा वकुब वेगळा आहे, कमी-जास्तसुद्धा आहे. गेयता आणि लय याजवर त्यांची पकड ग्रेस किंवा सुरेश भट यांच्याप्रमाणेच दमंग आहे. शिवा राऊतला यातला कोणता कवी भावत होता, होता की नव्हता, ते सांगता यायचे नाही. मात्र कवी ग्रेस यांच्या कवितांवर तो लुब्ध होता असे पक्केपणाने विधान करता येईल. कारण आपल्या 'अक्षर-उत्सव'ला कवी ग्रेस यांची प्रस्तावना असावी असे शिवाला मनोमन वाटत होते. त्याने त्यासाठी प्रयत्नही केला होता, असे दिसते. त्याच्या प्रयत्नांना उत्तर म्हणून कवी ग्रेस यांनी चार ओळींचे जे पत्र टाकले ते पत्रच शेवटी शिवा राऊतने आपल्या कवितासंग्रहात समाविष्ट केले आहे. त्याच्या काही कवितांवर ग्रेस यांच्या बाजाची सावली पडली असल्याचेही लक्षात आल्यावाचून राहात नाही. नवोदितांच्या भारलेपणाच्या लेखनकाळात त्यांच्यावर एखाद्या मान्यवर कवितेचा थोडाफार परिणाम होणे अपरिहार्यच म्हणावे लागेल. उदाहरणार्थ शिवाची 'सती' ही कविता —

काळीज पिळावे कोणी
करुणेचा यावा सूर
पेटली उभी अविनाशी
अंगांगी कर्पुरगौर

हे ललाट अपसुक झुकले
झगमगता भूषणभोग
जोगवा नवा मागे तो
गुणसुंदर कृष्णपराग

मनमंथर भलत्या वेळी
झेलता सुखाचे झेले
ताऱ्यांचे नुपुर विदेही
लोचनी दीप झालेले

वल्कले गळाला देह
लावण्य सतीची आग
यतियोगे अवचित लाभे
दुःखाचा संतविराग

मूळ प्रश्न तो नाही. अपरूप अशा विलक्षण अनुभवांची झळाळती रत्न-माणके शिवा राऊत याच्या कवितेत जी सर्वत्र विखुरलेली आढळतात ती येतात कोठून? त्या अनुभूतींचा स्रोत कोणता असावा?

शिवाचे आयुष्य प्रामुख्याने ग्रामीण भागात गेले. मराठीतील संत वाङ्मय तो कोळून प्याला असण्याची शक्यता नाही. दैनंदिन जीवनसंघर्ष आणि त्यातले पराभव असे टोकाचे की व्यक्ती म्हणून तो टेकीस यावा आणि हताशतेच्या, निराशेच्या गर्तेत ओढल्या जावा. कोणताही एखादा विषय म्हणा, वाङ्मयप्रवाह म्हणा, कवी म्हणा किंवा लेखक अभ्यासण्याइतका निवांतपणा त्याचेपाशी होताच कोठे? त्याचा कुणी 'गुरू' नव्हता की बोट धरून त्याला आध्यात्मिक अथवा अभौतिक अथवा साक्षात्कारी अनुभवांच्या दिशेने घेऊन जाईल. तुकोवादिकांचे एका परीस ठीक होते. पांडुरंगाच्या चरणांचा ध्यास त्यांनी घेतला होता. भोवतीचे पहारे असे की पांडुरंगाशीही दोन द्यावे, दोन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घ्यावे असा रोखठोक हिशोब ते मांडू शकत होते. शिवाकडे तसे करण्याचीही सोय नव्हती. परंतु त्याच्या अभंग-लेखनाचा सारा घाट मात्र थेट तुकोबांच्या सारखाच आहे.

मी तो या मातीची
उन्हविराणी वो
अंगांगाला टाहो
        वादळाचा

जाणतो नित्याच्या
पावसाचा हेतु
मिठीत अनंतु
        अभंगाच्या

म्हणूनच मीही
माझ्या अवरोला
आषाढाचा केला
        कृष्णचंद्र!

अशासारखे अनेक अभंग शिवाच्या संग्रहात सापडतात. त्यांचे नाते थेट संतकुळाशी जोडता येते. एक बाज म्हणून हे वळण घेणे शक्यही आहे; परंतु त्यातून डोकावणाऱ्या साक्षात्कारी अनुभवांचे काय?

स्पर्शाविन झुले
देहाचा पाळणा
तान्ह्याहून तान्हा
        झालो आता

देहूच्या शरीरी
अपंगली रात
अर्ध्या उत्सवात
        पार्थी आलो

वेडी इन्द्रायणी
आसऱ्याला आली
अभंगात न्हाली
        कावडीत

तुझी तर माया
तिच्याहून भारी
अमृताच्या सरी
        आंघोळीला

अशासारखे अभंग सहजपणाने शिवा राऊत लिहून जातो. त्यातला अपार्थिव अनुभव परंपरेचा भाग म्हणून शिवाच्या लेखनात येतो की कसे, त्याचे नेमके उत्तर कसे देणार? लेखनाला विशिष्ट वळण पडले की काही एका मर्यादेपर्यंत अर्थाच्या कसरती करता येणे अशक्य नाही. परंतु कसरत कोणती आणि अस्सल लेखन कोणते हे शेवटी ओळखले जातेच. शिवाच्या कविता वाचल्यावर त्याचे लेखन कसरतीचा भाग आहे या म्हणण्याला काही अर्थच उरत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिवाला भास होत असावेत का ? मराठीत या अंगाने कवितेला कोणी तपासत नाही. शिवाला साक्षात्काराची स्वप्ने पडत असतील का? इंग्रजीमध्ये ज्याला 'हॅल्युसिएशन' म्हणतात तशी भावावस्था भावूक आणि अतिसंवेदनशील मनाची होणे अशक्य नाही. कवीला वेड्यात काढणे अथवा त्याला मखरात नेऊन बसवणे अशा दोन टोकातूनच मराठीत कवीकडे पाहिले जाते. या दोन टोकांच्या मधल्या पातळ्यांचा विचार मराठी समीक्षेला करताच येत नाही. परंतु तोही करता येण्यासारखा आहे, असे शिवाच्या कवितांवरून जाणवल्याशिवाय राहात नाही. एरवी शिवाच्या आधिभौतिक काव्यानुभूतींना न्याय देता येणार नाही.

शिवा राऊतचे स्वतःचे या संदर्भातील स्पष्टीकरण फार बाळबोध असे आहे. 'अक्षर-उत्सव' या संग्रहातील आपल्या मनोगतामध्ये तो म्हणतो : "आजवरचे आयुष्य खेड्यात गेले: गावकऱ्यांच्या भावजीवनाशी समरूप झालो. त्यांची सुखदुःखे जवळून पाहता आली. रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या त्यांच्या भावभोळ्या भजनांचा सखोल संस्कार मजवर झाला. त्याचेच प्रतिबिंब माझ्या बहुतेक कवितांमधून उमटलेले दिसेल...."

शिवाच्या या प्रांजळ प्राक्कथनाला आक्षेप घेण्याचे कारण नाही. ग्रामीण भागामध्ये देवाच्या नावाचा सश्रद्ध गजर होत असतो. त्याचाही एक संस्कार कवीच्या भावजीवनावर होणे स्वाभाविक आहे. परंतु फक्त तेवढ्याने शिवाच्या कवितेतून प्रकट होणाऱ्या अनुभवविश्वाची संगती लावता येत नाही. आणि लावता आली तरी ती पुरेशी आहे असे म्हणता येत नाही. उदा. ही कविता पहा -

माझे पान-मन
फांदीलाही भारी
झालासे शेजारी / दगडांचा

राहे जरी येथे
नशिवाला उन्ह
वादळे लेवून / झाकेन मी

लंगड्याने पायी
बांधले वो नभ
तरी त्याची आव / मातीपाशी

शिवा राऊतची अनुभूती अशी येथल्या मातीशी जोडलेली असली तरी तिचा विहार कुठल्यातरी अवकाशातच असतो. त्याची संगती मग लावणार कशी ?

॥ ३ ॥

शिवा राऊतचे आयुष्य खेड्यात गेले. तेथल्या निसर्गाचे आणि गावजीवनाचे चित्रणही मग अपरिहार्यपणे शिवाच्या कवितेत दिसून येते. हे चित्रण प्रत्ययकारी तर आहेच, पण त्याच बरोबर वेगळेही आहे —

अल्याड डोंगर, पल्याड गंगा
मधी मारोती गावधुरंधर
उतार भांगातुन कौलांच्या
उन्हे सांडती मोत्याचा चुर

खरे तर आजचे खेडे कवितेतून डोकावणाऱ्या खेड्यांसारखे राहिलेले नाही. त्याचा चेहरा-मोहरा बदलून गेला आहे. परंतु हे वास्तव शिवा राऊतला मानवणारे नाही. त्याच्या कवितेतल्या खेड्यातली घरे कौलारू असली तर त्यांचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वळण भांगासारखे असते आणि त्यातून मोत्याच्या चुरासारखे उन्हे सांडलेली असतात. मग त्याच धुंदीत शिवा राऊत आपल्या गावाचे चित्र असे पूर्ण करतो -

फाल्गुनरंगी पाणवठ्यावर
राधेसम रूप न्हाती पोरं
पळसपेटली दुपार होता
घरी परतल्या खेळुन होरी
लिंबाऱ्याने अभाळ शिंपित
वाटवावडी पुजा चालली
केसमोकळी भाविण कोर्णी
ओलेल्याने नवरा बोलली
गावदेवीला मरठ भरा ग
उदवा भातावरची साय
कांकणकुंकू अभंग रक्षिल
पिकविल ओटी मातामाय
नाचणवेड्या उनाड गायी
सांजदिव्याला हंबर येती
सोनखुरांनी उजळ उंबरा
मुकुंद-माधव अता पाजती

मराठी कवितेत येणाऱ्या निसर्गाविषयीचे आपले काही ठोकताळे ठरून गेलेले आहेत. बालकवींसारख्या मान्यवरांनी हे ठोकताळे सुनिश्चित केले आहेत आणि त्यांची मूल्यात्मकताही वादातीत अशीच आहे. शिवा राऊतच्या कवितेत तसा निसर्ग कदाचित दिसणार नाही. तो वेगळेच रूप घेतो. 'ओंकार' ही कविता बघा -

एक गाव असा
आखरकाळीचा
पाखरहाळीचा
        झाडझुला
ओहोळ पाण्याची
डावी वेसकूस
उजवी खडूस
        कोटकळा
सखोल थोरला
आवडीचा आंबा
माणसांचा थांबा
        सावलीला
जुनार चिऱ्याची
कासवाची बाव
पोहरा पडाव
        पायरीला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घागरमाथ्याचा
देवळी रिघाव
लोकी रुजे ठाव
ओंकाराचा

गाव, गावच्या पोरी, देव-देवरकी, गावाची ठेवण, निसर्ग आणि अर्थातच 'पाऊस' हे मराठी कवितेचे नेहमीचेच विषय आहेत. कवींनी आपापल्या वैशिष्ट्यांनी हे विषय वलयांकित केले आहेत आणि त्यावर आपली अमीट मुद्राही उमटविली आहे. शिवा राऊत हा कवीही या परंपरेला अपवाद नाही. त्याच्या प्रतिभेची कूस अशी सुवर्णकांती ल्यालेली की, पाऊस हा नेहमीचा काव्यविषयही विलक्षण वेगळ्या अवलख रूपात समोर यावा

आला पाऊस आला
मातीवरती मनोरथाचा उधळित थेंबरिसाला
धुंदधुरंधर अवलख धारा
जळटापातून वाहे वारा
चराचराला स्पर्श लाभला पुन्हा हरीचा ओला
टपटाळ्यांची कुठे मेळणी
झाडांतुन मंथरले पाणी
तृणपर्णावर जसा सांडला चिदंबराचा झेला
पाचूचे उलगडले अंतर
घटगंगेचा सलीलशंकर
नदनाल्याच्या उदरामधला नीरव होऊन धाला
वर कष्टाचे आंदोळ उसळती
रेघातुन टवटवली पाती
शेतमळ्यातुन कृषककुळांचा हिरवा उत्सव झाला.
आपाढुन येताच पंढरी
वाजत-गाजत गेली वारी
सावंगे की इथे वितळला विठो सावळा तिथला.

निसर्ग आणि पारंपारिक मराठी मानसिकतेमध्ये रुजून असलेला 'तो' - देव यांचे संमोहक मिश्रण जेव्हा शिवा राऊतच्या कवितेमधून साकार होते तेव्हा त्या कवितेची एक प्रार्थनाच होऊन जाते. निसर्ग चित्रणाची अशी प्रार्थना होण्यातून शिवा राऊतच्या प्रतिभेचे पुन्हा वेगळेच दर्शन रसिकमनाला घडते.

तू करुणाकर, तूच चराचर
व्यापुनि उरला दशांगुळे
तू अविनाशी, विघ्नविनाशी
तू तेजाची सूर्यकुळे
कृष्णघनातुन तुझीच नुपुरे
पाऊसकाळी छुमछुमती
मातीमधुनी तुझ्या रुपाची
रोपे हासत अवतरती....

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्या ओळी काय किंवा 'घनव्याकुळ' या त्याच्या कवितेतील खाली दिलेल्या ओळी काय, कविमनाची सश्रद्ध भावूकता निसर्गातील प्रतिमानांनी काव्यबद्ध होते व निसर्गाला एक वेगळा आयाम प्राप्त करून जाते. (कवी ग्रेस यांची आठवण अशा वेळी होते का ?)

या पुनवपहाटे आला
पाऊस कशाला बाई
ओलेरे आंगण झाले
वाऱ्याला नाचणघाई
डोळ्यात जागवित होते
जत्रेतिल गोंदणवेल
स्वप्नांचें अलगद् गेले
वाहून कुठे गोकुळ
जात्यावर मालन कोणी
हळुवार सख्याला गाता
उजळून गावच्या वाटा
रानात निघाल्या आता
तू रानपाखरा जा रे
त्या प्राणफुलाच्या गावी
झाडात शहारुन जाता
घनव्याकुळ ओळख द्यावी

॥ ४ ॥

शिवा राऊतच्या अशा भावविव्हळ कविता प्रामुख्याने युगवाणी, तरुण भारत, लोकमत, जनवाद आणि नागपूरचे आकाशवाणी केंद्र येथून प्रकाशित झाल्या आहेत. विदर्भात ती कविता सर्वदूर पोचली, परंतु विदर्भाबाहेर मात्र फारशी गेली नाही. त्याचा 'अक्षर-उत्सव' हा एकमेव कविता-संग्रह अगदी अलीकडेच - मार्च १९९३ प्रसिद्ध झाला. राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदान योजनेमुळे तो प्रकाशित होऊ शकला. दुर्दैवाने, त्यामुळे, ज्यांच्यापर्यंत ही कविता जायला हवी होती त्यांच्यापर्यंत ती पोहचू शकली नाही. निवडकांच्या खाजगी बैठकांमधून शिवाची कविता नाणावली गेली, परंतु महाराष्ट्राच्या पातळीवर अद्यापपर्यंत तरी त्याच्या कवितेकडे लक्ष गेले नाही. अकस्मातच शिवाचे निधन झाल्याने त्याच्या लेखणीला पूर्णविराम मिळाला, त्यामुळे त्याच्या कवितांकडे रसिकांचे लक्ष जाण्याची शक्यताही कमी झाली. शिवाच्या कवितेचे हेच विधिलिखित आहे की काय नकळे !

शिवाची सर्व कविता अनुभवांच्या आणि अभिव्यक्तीच्याही अंगाने एक पदरी अथवा एकसुरी झालेली आहे. अशा एकरेषीय कवितेच्या स्वतःच्या मर्यादा असतात. त्या कवितेचे ते बलस्थानही असते. भोवतीच्या काचणाऱ्या परिस्थितीविषयीचे पडसाद त्याच्याही कवितेतून आलेले आहेत, परंतु त्यांचीही अभिव्यक्ती एकरेषीय पद्धतीनेच होत गेल्याने उठाव मिळाला नाही.

आसवांचे मूळ कोठे नाकळे
आतल्या आतून सारे उन्मळे
का उन्हाची वाळवीच्या सारखी
लोचनात कोरणारी वारुळे ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे प्रश्न शिवालाही पडायचे. प्रारब्ध आणि करताकरविता-शरणता या पिण्डगत धारणेमुळे अशा प्रश्नांचा शेवटही मग अपरिहार्यपणे "दुःखलुब्धा तू तरी वणव्यात थोडा। अब्दशब्दांच्या सरींचा ओत पान्हा" ह्या ओळींनीच होतो. शिवाच्या कवितेची, एका अर्थाने, ही मर्यादाच ठरते.

॥ ५ ॥

भाषा-साहित्याच्या अभ्यासामध्ये 'शैली-शास्त्र' ही विद्याशाखा नव्या काळात विकसित झाली आहे. या अंगानेही शिवा राऊतची कविता अभ्यसनीय आहे. पारंपारिक प्रतिमांची झुंबरे त्याच्या कवितेमध्ये जागोजाग भेटतात. झळाळत्या शब्दकळेचे दैवी देणेच त्याच्या प्रतिभेला लाभलेले होते. परंतु त्याचबरोबर ग्रामजीवनाशी एकरूप झालेल्या प्रतिमा आणि शब्दही शिवाच्या कवितेत भेटतात. शैलीशास्त्राच्या दृष्टीने त्यांचा अभ्यास झाला पाहिजे. मातीमातीतून वर येणारा कोंबाचा उखाणा, वाऱ्याची नाचणघाई, गोंदणवेळ, प्राणफुलाचे गाव, तुळसामाऊली बाई, बोरकाटीचा आकडा, तुला देईन जरीच्या सोनटिक्कीचा खण, धांड्यामांड्यातला पोखळा ऋतुगर्भ, तटतटणारी ओसाड वने, पोरींचा जागव, लावण्यसतीची आग, डोंगराला डोळा, मधाचे रान, अहेवाची मार्ता, गावधुरंधर मारोती, लिंबाऱ्याने आभाळ शिंपणे, साईची सुई, पिकांचे निवाडे, पोपटांनी उष्टावलेला घास इत्यादी प्रतिमांची रेलचेल शिवा राऊतच्या कवितांमध्ये आढळते. या प्रतिमांच्या वेगळेपणाचा शैलीच्या दृष्टीने अभ्यास झाला तर मराठी कवितेला विदर्भाच्या कवितेचे जे योगदान आहे ते अधोरेखित होईल असे वाटते. ग्रेस, उ. रा. गिरी, सुरेश भट अथवा जुन्या पिढीतील ना. घ. देशपांडे, गु. ह. देशपांडे या वैदर्भीय कवितांचा आपापला स्वतंत्र बाज आहे. हा बाज समकालीन मराठी कवितेपेक्षा वेगळा कसा याचे कोडे शैलीशास्त्राच्या अंगाने त्यांच्या त्यांच्या कवितांचा स्वतंत्र वा एकत्रित अभ्यास होण्यानेच उलगडू शकेल. विद्यापीठांच्या स्तरावर हे काम झाले पाहिजे. शिवा राऊतच्या निमित्ताने वानगी-दाखल या संदर्भात काही कवींचा मी उल्लेख केला. इतरही कवींची नावे त्यात जोडता येतील हे ओघातच आले.

वामन तेलंग

अक्षर-उत्सव : प्रकाशिका - सौ. स्नेहसुधा कुलकर्णी, निहारा प्रकाशन, ५३४ बुधवार पेठ, पुणे-२. मूल्य रु. १५

युगवाणी

'युगवाणी 'ला पुढील विषयावर वैचारिक लेखन अपेक्षित आहे.

१. सामाजिक मूल्ये व वाङ्मयीन मूल्ये
२. सामाजिक मूल्यांचे आव्हान
३. सामाजिक मूल्यांच्या अंगाने वाङ्मयाची तपासणी
४. मराठी कविता आणि सामाजिक मूल्य
५. सामाजिक मूल्य आणि मराठी कादंबरी
६. सामाजिक मूल्य आणि मराठी कथा
   (क्र. ४, ५, व ६ यात १९६० नंतरच्या लेखनाचा विचार मांडण्यात यावा.)
७. सामाजिक मूल्यांचा उद्घोष - मराठी नाटके
८. मूल्यांची बांधिलकी व लेखकाचे स्वातंत्र्य
९. सामाजिक मूल्यकल्पना आणि स्त्रीजीवन

संपादक युगवाणी विदर्भ साहित्य संघ, खांडवेकर बंगला, रामदास पेठ, नागपूर-१०.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अक्षरउत्सव

अक्षरे भिजावी ऐसी
आधीच अनावर ओळ
राधेच्या देहपणाचे
आतून अनाहत चाळ
नाचातून मयुरमनाच्या
मेघांचा कागद ओला
पायात ऋतू उलगडले
घननाद दिशांना गेला
गाभारा उजळून आला
हे थेंब आरती झाले
दुःखाचे स्वर्गझुल्यात
गोकुळ निजेला आले
अंगांगी कृष्णमिठीने
जन्माचे देऊळ सजले
गोपुरे रचावी त्याचा
हा अक्षरउत्सव चाले.

निर्वाण

अगा म्याहि पामराने
उभे विठ्ठलास केले
फक्त मातीच्या विटेने
थिटे कैवल्य सांधले
आणि म्हणूनच माझ्या
दारी थांबले निर्वाण
नको वैकुंठीचा वास
म्हणे पंढरीवाचून-
अशी वानगी विठूची
जेव्हा तुक्याने गायिली
त्याच्या अभंगाची वाणी
वाळवंटातही न्हाली
तेव्हा परब्रह्मासही
वाटे लाजून स्वतःला
संजीवनाचा सुवास
चंद्रभागेच्या पाण्याला.

उत्सव

स्पर्शाविन झुले
देहाचा पाळणा
तान्ह्याहून तान्हा/झालो आता
देहूच्या शरीरी
अपंगली रात
अर्ध्या उत्सवात/पायी आलो
वेडी इंद्रायणी
आसऱ्याला आली
अभंगात न्हाली/कावडीत
तुझी तर माया
तिच्याहून भारी
अमृताच्या सरी/आंघोळीला

नभ

माझे पानमन
फांदीलाही भारी
झालोसे शेजारी/दगडांचा
राहे जरी येथे
नशिबाला ऊन्ह
वादळे लेवून/झाकेन मी
लंगड्याने पायी
बांधले वो नभ
तरी त्याची आव/मातीपाशी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घनव्याकुळ

या पुनवपहाटे आला
पाऊस कशाला बाई
ओलेसे अंगण झाले
वाऱ्याला नाचणघाई

डोळ्यात जागवित होते
जत्रेतील गोंदणवेळ
स्वप्नांचे अलगद् गेले
वाहून कुठे गोकुळ

जात्यावर मालन कोणी
हळुवार सख्याला गाता
उजळून गावच्या वाटा
रानात निघाल्या आता

तू रानपाखरा जा रे
त्या प्राणफुलाच्या गावी
झाडात शहारून जाता
घनव्याकुळ ओळख द्यावी.

दिवेलागण

डोळियांच्या वाटा झाल्या
घरा आली न पाऊले
बाई तुळसमाऊले.
दिवेलागणीला उगा
सांजव्याकुळ नकोसे
कसे अंधार उसासे.
उभी रात पापणीच्या
काजळाची लागे झरू
किती चंद्रखुणा स्मरू.
बोरकाटीचा आकडा
तसे उरात काजवे
सले वाटेतली गावे.
भुर्र पहाटपाखरा
उडायचे लवलाही
माझा भरतार पाही.
तुला देईन जरीच्या
सोनटिक्कुलीचा खण
चोच मधाने भरेन.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गौरीजागर

खडकात साचले पाणी
वा अडवीतिडवी काच
लाटातून जीव फुटावा
असलाच सुनेला जाच

आभाळ दाटले दूर
अलिकडला किरणपिसारा
सासरच्या शवल सुखाचा
अंमळसा दुखरा वारा

हा धांड्यामांड्यातून
ऋतुगर्भ पोसला जाता
ओसाड बने तटतटली
कोवळ्या उन्हाचे न्हाता

गौरीच्या लागुन कानी
भोवंडुन आली काया
क्षितिजातून उगवे तैसी
उदरातून खुणवे माया

भजनात रातले खेडे
घर मातीचे मंथरले
गाण्यातून तलम गळ्याच्या
पोरींचा जागर चाले

ओवीछंद

मनातला चंद्र
पापण्यात आला
आसवात न्हाला
नभ निळा

खुळी चंद्रभागा
काळजात वाहे
किंवा तो प्रवाहे
ठायीठायी

आता मी आतला
ओवीछंद गातो
पहाटून येतो
जात्यासवे

अक्षयआंदण

बरडभुकेल्या मुखात आचळ पिळून आला पाऊस पान्हा
पुलकित झाले डोंगरकाळिज निळासावळा झेलुन कान्हा
मातीमधुनी हिरवीपिवळी रोपे न्हातच गातच आली
कोण उखाणा अणुरेणुला वाऱ्यामधुनी अवचित घाली
की बापाच्या डोळ्यामधले अश्रू असेच वैभव होते
अथवा कोणी माय सुखाचे पिढ्यापिढ्यांना रांजण भरते
गावकुसाला साजतगाजत बैल जायचे तोरणमाळा
तोवर लक्ष्मी उगाच हसवी बिल्वरातला हिरवा चाळा
कार्तिकातले आजच डोळा दीपावलीचे सचित्र अंगण-
उमलुन येता उद्या मुलींना शेते देतील अक्षयआंदण.

कथा

चिंमणचांदण्या या पाचूच्या प्राणामधल्या
अलगद झेला हृदयावरला चुंबित गेल्या
पुढे मधाचे रान कथेतील मंत्रभारले
गे वाऱ्यावर उन्मनीतले वस्त्र सांडले
अशात वेडी अधरफुलाशी अडली मैना
अंगांगातून लहरत गेला सांजउखाणा
सगुणघनासम राजपुत्रसा साजण आला
काय वेगळे संचित मागु सांग सुखाला!
लोचनातले प्रसन्नपावन माणिकमोती
रात्र.निजेच्या सरत्या सर्गामधली होती

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अहेव

तुझ्यासाठी जीव
उलत्या प्रमाणे
कोंबाचें वाढणे
लाभले गा

परंतु उदारा
असा थेंबलास
पानात पाऊस
पेटवला

आणि उन्हातली
बांधलीस नाती
अहेवाची माती
जन्म झाला

आठव

सायीच्या सुईने
काढलास काटा
डोळे पाणवठा
पुनवेचा

पायीचा फुफाटा
वेचलास ओटी
पापण्यांच्या काठी
सांजवात

कितीकदा श्वास
पाचुची पैंजणे
दुःखाला देखणे
कोंदण वो

इथे तिथे आता
धूळ आठवांची
आणि आसवांची
मृगजळे.

अभिषेक

गर्भारून आले तेव्हा
वितळला कुशीचा मेघ
तनुसंपुट झरता सरता
वाहती सजल अनुराग

बाजूस पाहता थोडे
उमलले पोवळे ओठ
नि स्तने देवकोटीच्या
अभिषके वत्सलपेठ

सुभगा

सुभगेच्या श्वासामधले
वाऱ्यावर पसरे देउळ
अलवार जोडवी जुळता
मातीला अडते पाऊल

सुभगेच्या भांगामधले
पाण्यावर पडले कुंकू
की सजल्या काचमहाली
अनिरुद्ध पाहती जिंकू

सुभगेच्या ओठामधल्या
तबकात उजळल्या ओळी
आभाळवनातून आला
घनगिरिधर पसरे झोळी....

सुभगेच्या पायामधला
पाण्यावर तरला तोडा
तिमिरात आरती येथे
गावातून खचला वाडा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चंद्रनवती

नाच पोरी नाच
तुझ्या चाळाला काच
डोळ्यात तिढा, पाण्याचा पाढा
गरत्या-फिरत्या तालात वाच

भूल बाई भुली
कशी जोशात आली
वाऱ्याला ओली, भोवळ आली
झुलत्या नागाची चुंवळ झाली

धाव पोरी धाव
तुझा सरता डाव
बापाच्या घरी, पणती दारी
आणि मंजिरी मनात लाव

पोर बाई पोर
हिचे नशीब थोर
राजसवाणा, रुपाचा राणा
चंद्रनवतिची तू तर कोर

प्राक्तनफुले

पावलांना पडे
हळदओली मिठी
पुनवपर्वातला
चंद्र आला दिठी

सगुण ओठातला
भाव झाला मुका
अर्थ स्पर्शातल्या
ईश्वरा सारखा

आज ना ठाऊके
द्वैत देहातले
येत रोमांचुनी
प्राक्तनाला फुले

अद्वैत लाभलेले

विरहात कोंदलेले, काळीज मुक्त झाले
आणि मुक्या स्वराला विलगून शब्द आले

आतूर मी कधीची होणार कृष्णमाला
अद्वैत लाभलेले येथे जिवाशिवाला

माझ्या तनामनाचे गोकुळ धन्य झाले.
आता युगायुगाची राधा कृतार्थ झाली

मजला मनोहराने हलके खुडून नेली
आनंदसागराचे डोळा तरंग न्हाले.

का आज थरथरावा पायी अनंगवाळा
श्वासात गुंतलेला वारा सलज्ज भोळा

वस्त्रे दिशादिशांची नेसून धुंद झाले.
देऊन ओठ ओठी मिटला मिठीत रावा

हा व्यर्थ भाव माझा मज लाभला विसावा
त्यांच्याच सावलीचे मी एक अंग झाले.

दोन पाऊले

समूर्त साजरा सखा पाहताच वाकले
लोचनात रेखिली समर्थ दोन पाऊले.

भावपाकळ्यातली फुलून येत वैभवे
पारिजातकापरी झरे विनम्र आसवे

वाळवंट पाझरू लागले मनातले.
अभंग संगीतातला देह पंढरीपरी

प्राणवल्लभासमीप मीच सूरबावरी
चैत्रस्पर्श लाभले वसंत उत्सवातले.

नको सखे, पुन्हा पुन्हा तो मुहूर्त आठवू
उगाच ते उदार या भाषणात लाजवू

गंध मंद जाईच्या कळ्यास बांध कुंतले.
लोपली उन्हे अता वादळे विसावली

मजकडे स्वतःच ये आश्रयास सावली
आज या पदासवे सप्त स्वर्ग लाभले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गेले तुटून पंख

येथे मुक्या जिवांना
आभाळ आठवावे
तेथे दयाघना तू
काळीज गोठवावे

आली तृणे परंतु
अंगार भोगताहे
पाण्यात पोळणारे
ओढे तुलाच वाहे

आता नसे नभाला
ते रंग गंध ओले
मोडून एक नक्षी
पक्षी उडून गेले.

हातास काम नाही
स्वप्ने उजाड होती
येथे कृषीवलांच्या
डोळ्यास पूर येती

थेंबविना उन्हाचे
हो श्रावणास डंख
या वाढत्या पिकांचे
गेले तुटून पंख

तुळस

इतुके न साहे
उन्हाचे वळण
उदास अंगण/सांजपिसे
पुनवेला खोल
आठवांचे व्रण
आतुन उधाण/अवसेला
काजळकातर
कालिंदिचा डोळा
गोपुरसावळा/गहीवर
तुळशीला आला
गोधुलीचा तोडा
चांदव्याचा चुडा/कुंकवाला

गोष्ट

देठदुखरा हात झाला
चढत गेली बांगडी
काय पुसशी मैत्रिणीला
गोष्ट थोडी वाकडी

पार पिकली लिंबकांती
बहर झाला वावरा
गे तुझ्या लावण्यगेही
मोर आला नाचरा

आपुली घेऊन जाशी
दीपोत्सवाला कुंडले
चालताना काळजाशी
काचशी तू मेखले

वाढत्या मासादिसांना
उर्वशीचा वाण आला
काय छळशी मैत्रिणीला
देठपिकला ओठ झाला

स्वप्नहूल

रोजचीच स्वप्नहूल
तिमिरताप जाळतो
लोचनात सारखा
चंद्र चिंब नाहतो
पर्णपारख्या तरूत
म्लान चांदणे गळे
अंतरात काहिसे
स्फुरे तसेच मावळे
मधेच हा सकंपवात
छळून रातराणीला
मला पुन्हा स्मरून दे
सुगंध कुंतलातला
उद्या वसंत यायचा
सगुणसाजरा सखे
अनंत वैभवातले
इथेच रंग पारखे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जळभरणी

उन्हेउजाड गाव नि
पुसट पांढरी घरे
धुळीत येथल्या अजून
वृक्ष एक मोहरे
दूर झांजऱ्या लयीत
परत सांजपाखरे
हाकेवर जळभरणी
दिव्यात रात्र कापरे
वडास पार झोंबला
व्यथा उदास वावडी
शेंदरातल्या भयात
सुनी पिशाच्च-बावडी
तोच ये दुरून दीप
सतेज खापरातला
कथेत आठवातल्या
उरोज उच्छ्वासला
अजून चैत्रस्पर्श या
धुळीत मंद मोहरे
पार येथला उगाच
अबोल दुःख पांघरे

अक्षर

अश्रद्ध उतारे
बेरकी शीर्षके
आशयाचे धुके/व्यर्थ आम्ही
तुम्ही प्रत्ययाचे
प्रमेय मांडले
वेदनेचे केले/भागवत
आम्ही अध्यात्माची
नाचरी लक्तरे
रिकामे देव्हारे/दांभिकाची
तुम्ही अक्षराला
आयुष्य तारण
अहो संतजन/वृथा आम्ही

पोर

गे कविते तू अर्थवतीचा काजळडोळा
स्तनओठाची मायपणातिल पाजणवेळा
तुझ्यामुळे मी असा अनावर दुःखदेखणा
तुझ्या उजागर अपरूपाचा चोरपाहुणा
कधी तुझ्याशी सद्गदातले जोडुन नाते
ओवीमधले तुझ्याच हाती फिरते जाते
सड्यात साजे रांगोळीचा रंगपिसारा
चुडा जोडवी कुंकू याते तुझा पसारा
कविते मी तर तुला साहले मला दाहले
साठवआठव आसवातले टिपून ओले.....
उरी सावळी सांज भरावी भीतबावरी
पोर जशी तुळशीच्या पारी दिपाळणारी

सृजन

अकिंचनाच्या दारी दानत
नावडतीचा ओठ कडू
नाकावाचून नकटी बिंदी
दोघे आपण असे रडू
पाण्यावरली रेघ मोडली
तुझा नेटका फुटे घडा
असते काही सखोल त्याचा
काय जोडशी काठतडा
काल तुझ्या हौसेच्या हाती
एक पाखरू भिरभिरले
उरात काही सुखासारखे
निळेसावळे शिरशिरले
सघनस्वातिच्या थेंबासाठी
दूर नभाच्या मुळात जाऊ
लोचनपाणी जर नावरले
पाउसवाणे झरून येऊ
अनावराचे ओले लाघव
पुढे भोवळे क्षितिज जरा
चुंबन येथे सकाम बवोटे
तू सृजनाची गहन धरा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पालखी

मिथुनमथिला कृष्ण याते लाज काये
आतली आभाळअंगे की प्रवाहे
दंशधुतल्या भ्रमरभोगातून त्याचा
राधिकेसा लोचनाला   पूर लाहे

कूड कसली थाटली आदिमिठी
भवभयाला देठली रोमांचराने
वा नभाला सावळ्याची साय यावी
लाख अथवा प्रीतिला   वृंदावने

देह आता वेदनेचा पुलकपावा
वंशनिद्रा गोठल्या गर्भात जागी
अनृताशी अमृताचा संग न्हाया
रासरतला मज खुळीला अधर मागी

काय आयुष्यास मागावे अता या
दूर गेला खूरदुखरा काफिला
प्राक्तनाचा मोडला खांदा परी
पालखीला चिन्मयाचा स्पर्श झाला

गोधन

आभाळपाण्याला
निजला काजवा
कसा करू दिवा
*   दारवठा*

जिवातून जाय
पैल पायवाट
झांजरात घाट
*   गायरान*

हंबरपिसा हा
पाजण स्वभाव
दाटलिया देव
*   गोधनाचा*

वास्तव

गुलाबात गायी
चरायास जाती
आचळात माती
*   पडेचना*
लाभले निजेला
मुक्तीचे अस्तर
पाचूवर खूर
*   उमटून*
अभाग्याने किंवा
ओपले अत्तर
स्वप्नांचा विभोर
*   रात्रपान्हा*
हाय मात्र पुन्हा
उजाडे हपाप
आयुष्याला शाप
*   वास्तवाचा*

तीर्थ

सहज सखीच्या भाळावरले काचप्रवाही पडले कुंकू
न्हात अशी की कार्तिकातले ऊन्ह लागले पहाट झाकू

सांजउतरणीमधे काल जे भरून आले काजळ डोळी
तसा नेमका घनगिरिधर तो मनात पसरे श्रावणझोळी

हंबर-झुंबर निपचित झाले डोहावर साकळली छाया
तिच्या उरीचा प्रणवप्रीय ये अवचित काही कुशल पुसाया

पुन्हा म्हणाली सये सांग मज अनिरुद्धाचा प्रसंग पाढा
कसा उषेने वरला मन्मथ चित्रामधला उटवुन वेढा

जिवार्तातले भावफूल मग संगनिरामय मृणाल झाले
तीर्थाचे घट वोळून आले देहामधले प्रयाग ओले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चित्तुरचांदवा

पेरपारण्यात
उण्णारली वटी
बिज्जोर पह्याटी
पालवली
इखारला काटा
रूते रोपणात
टुक्कार तणात
तुडवला
गोजारला गाभा
काढला फुल्लोर
तिचा म्या जोजार
जिव्वारला
आता अगासात
पाहे तू टिप्पुर
मातीचा चित्तुर
चांदवा गा

ओवीसंग

कोण्या एके दिशी
आकाश पेटले
पाचोळ्याची झाले
वावटळ
नाहीच जळाला
ध्यास माझा आणि
धुळीचा ध्यास नि
टाळी झाले
ऊर उभारावा
हेच चैत्रलेणे
नभाची कोंदणे
सजवाया
असा किती दिसा
ओवीसंग झाला
श्रीरंगच न्हाला
डोळियात

नवस

आणा बाई मला नथीचा नग
देवीच्या जत्रेला जाऊया मग
वावरी आऊत नेमाला धाडा
धामणी जोडी गाडीला जोडा
आजचा पाडवा पहिला सण
लिंबाखाणाचा गुढीला खण
धुतल्या घराला तोरण बांधा
मघा म्या घातला पुरणरांधा
राहून राळला धुपाचा निवा
गायीला निवद कुशीला दिवा
दाटली पांदण उडाली धूळ
पुढच्या कोसाला मनाचे मूळ
देवळी कळस जवळ आला
काहूरकानात वाजला झुला
ओटीचा नारळ सुपारी वाण
पाचव्या पूजेला जिवाचे रान
हळदी-कुकाचा हवाला भला
पावला नवस माघारी चला

भावन

मीच तुझा ओठ पोरी देवीला लावला
पोवळाउजेड जीवलोलकात झाला

काजळाचा कळो आला वारुणीविराग
जन्मउन्हामधे तसा कापुरला फाग

काळजात कांचनाच्या आसावल्या वाती
अंबरापासून नेली तुला धूपारती

हिरवा वेव्हार केला गोंदणाच्या गाली
घनारली वासनेत रुद्राची सावली

शकेल आपला पाही पालट भोवळा
विनाशाला कधी कुठे अहिल्येचा डोळा

पावनात परोपरी ओवून भावला
असा तुझा ओठ पोरी देवीला लावला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वैष्णवसेतु

स्वप्नप्रहरशी धुकाळधूसर डोंगरपसरण
जशी दुरावुन दिठीत आली भिजली गवळण
उमळुन आला पाखेमधला प्राणपिसारा
अवनीवरती आरवसागर चेतनवारा
दिंडीमधला धुतला धाला गावगहीवर
सायीखाली जसे दुधाचे सद्गद् अंतर
थेंब अनावर कृष्णकळेतिल सजल सुखाचा
भाव येथल्या गोकुळवाण्या अनवरताचा-
गाव चालला आर्तामधला अभंग हेतु
दिगंत पुढती जुळवित अपुला वैष्णवसेतु

अभंगण्याला

उन्हे लपेटून कधीच गेली वादळवळणे
कुंण्या पिळाच्या चोचेमधले उसवून गाणे
उगाच आता अवचित गाळी सांज अनावर
आणिक लोचन कृष्णफुलांचे भिजले गोपुर
इथे जिवाचे पान उद्याच्या आषाढाला
मागे करुणादान पिलाच्या अभंगण्याला

धरा

अभिन्न तू मला जसा उन्हातला वसा
विषण्ण सावटातला उजेड काहिसा
उगा अपंग वाढला सावळा, विराग
संग वा दुभंग तेथ तूच अंगराग
चतुर चूलबोळकी मला न भावली
मानली मळभरीत चिद्घनावली
प्रशांत पापण्यात या समुद्र दाटला
प्रमोद नागवा तुझा विदग्ध दाखला
चंद्र चोरटा तिथून रात्र मानवी
विजनात तिमिराचे नाव काकवी
जाणला धुक्यात पाया भोवळा जरा
मिथुनगीत मोकळा मी उभी धरा

वसुंधरा

गे येथ लोचनाचे
पक्षी उडून येती
हलकेच वादळाला
छेडून धून जाती....

आनंदसावळी ही
देठे मुक्या मनाला
चैत्रात पालवीचा
मंदार उन्ह गाती

ये तारकावरून
निशिगंध आठवांचा
लाखो वसुंधरेचे
श्वासात चंद्र न्हाती

हसता सुरुंग पायी
उमले कळ्या सभोती
जातात सौख्यवाटा
उजळीत स्वर्गज्योती

हवा

वेदनाच आकळे न सांजरातुडे
प्रहरप्रस्तरात तमास या तडे

सुखापुढे कळवळून वात आणली
म्हणे भिजून आसवात घे व्यथावली

काल बोलला उन्हात पांगला थवा
आपुल्या अनुभवात सोय साठवा

का चुकून वाहवून वादळे तिला
तसूतसू रडू-हसू उगा उगाळला

झडून पाकळी तुला धुळीतली सखी
जरा न साहवे कळी पानपारखी

हा असाच आसमंत काळ वा नवा
जगात पाठ पालटू अम्ही जशी हवा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रया

शकुनाचा रमहखेळ संपवा तरी
सहज एकदाच या पावसापरी

का उगाच वाळूचा वाहता लळा
आपली म्हणा मला चिंबवा मळा

रातरात आसवात वात जाळली
गातगार्त आठवात ऊनसावली

प्राक्तनास मानता वियोग वाउगा
बाहता अधरदूर अर्पिता युगा

क्षितिज छिन्न नावडे अभिन्न आत्मया
विपन्न पापण्यातली हासवा रया ■ ■

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महेश एलकुंचवार यांचे ललित गद्य : एक आत्मशोध

डॉ. आशा सावदेकर

खऱ्या ललित गद्याचे सत्त्व हे 'मी 'पणाच्या शोधात साठवलेले असते. ना. सी. फडके ललितनिबंधाच्या स्वरूपासाठी एक चांगले उदाहरण योजतात : "एखाद्या जलाशयाच्या काठावर बसून आपण एक लहानसा दगड त्यात टाकतो, व मग जलपृष्ठावर उठणारे तरंग पाहात राहतो, तद्वत या आधुनिक निबंधप्रकारात कोणत्याही विषयाच्या निमित्तानं लेखकाच्या अंतरंगात उठणाऱ्या विचारविकार-तरंगाचं दर्शन घडावं....." मात्र फडके या उदाहरणात हे विसरले की, दगड कोठून टाकला, कसा - किती वेगात टाकला आणि ज्या जलाशयात टाकला त्याची खोली किती यावर तरंगांचे स्वरूप अवलंबून असते. दगड हे एक निमित्त असते, महत्त्व असते तरंगांच्या वाढत्या प्रसरणशीलतेला. ललित गद्य हे आकाराने लहान असते, पण त्यामुळे निर्माण होणारे भावतरंग रसिकाच्या हृदयात तळापर्यंत उठत असतात. फडके यांच्या उदाहरणातून ललितगद्याची भोक्तृप्रधान आस्वादप्रक्रिया फक्त दिसते. वास्तविक ललित गद्य हे भावचिंतनात्मक आकलन असते, सांस्कृतिक आणि मानवीमूल्यनिष्ठ आस्वादन असते आणि निर्मात्याचा अनुभव आणि निर्मितीची प्रक्रिया यामधील संपूर्ण ताणाचे मूल्यमापन असते. या मूल्यमापनात टोकाचा आग्रह नसतो. एक प्रकारे आकलन व मूल्यमापन यांचा वेगळेपणा जपून त्यांचा संवाद आस्वादनात गृहीत असतो. एखादे लक्षणीय कलातत्त्व, एखादे अंतर्मुख करणारे जीवनाचे अंग, मानवी मनाच्या गहन अथांगपणाची जाणीव करून देणारा एखादा क्षण, कलासक्त मनाने बेभानपणे एखाद्या अनुभवाला दिलेली दाद अशातून हे चिंतन संभवते. एखाद्या वास्तव घटनेपासून तो केवळ स्वप्नापर्यंत हा चिंतनाचा प्रवास संभवू शकतो. पूर्ण अलिप्तता, भावपूर्ण आत्ममग्नता, वैचारिक आकलन अथवा भावतप्त चिंतनशीलता अशा निरनिराळ्या छटा त्यात असू शकतात. हा फरक व्यक्ती आणि तिची प्रकृती यानुसार प्रकटत असतो. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, अनंत काणेकर या पहिल्या पिढीपासून आजच्या वासंती मुझुमदार, यशवंत पाठक यांच्यापर्यंत ही वेगवेगळी वैशिष्ट्ये दिसतात.

काही लेखकांनी भावना आणि सौंदर्यशोधाची वाट मोलाची मानली उदा. दुर्गा भागवत, श्रीनिवास विनायक कुळकर्णी, वासंती मुझुमदार; काहींनी चिंतन महत्त्वाचे मानले - उदा. कुसुमावती देशपांडे, ना. ग. गोरे; अगदी वेगळ्या वाटेने आत्मत्वाचा स्पर्श जिव्हाळ्यापर्यंत नेणारे लेखकही होते - उदा. यशवंत पाठक, कुसुमाग्रज; आपली कलासक्त आणि वाङ्मयासक्त वृत्ती मांडणारे काही लेखक दिसतात - उदा. शांता शेळके, बा. भ. बोरकर; काहींना चटपटीत अशी काव्यात्मकता महत्त्वाची वाटली - उदा. रवींद्र पिंगे, के. ज. पुरोहित; काहींच्या ललित लेखनाला वृत्तपत्रीय स्तंभलेखनाचा स्पर्श जाणवत राहिला तर काही ललित गद्यातून निराळे अनुबंध शोधत राहिले - उदा. व्यंकटेश माडगूळकर, मारुती चितमपल्ली. ललितगद्याने खूप नव्या वाटाही शोधल्या. उदा. पु. ल. देशपांडे यांनी व्यक्तिचित्रणात आणलेली अपूर्वता, गंगाधर गाडगीळ व प्रभाकर पाध्ये यांनी प्रवासवर्णनाला दिलेली चिंतनसामर्थ्याची जोड, पु. भा. भावे यांनी केलेले काव्यात्मता व रसप्रसन्नतेचे अजोड मिश्रण, माधव आचवल यांनी वास्तुविद्या व वाङ्मयप्रेम यातून दिलेला 'परतत्त्व' स्पर्श, ग्रेस यांचा गद्यकाव्याचा चिंतनशील तरीही प्रतिमावाहुल्याने मनात रेंगाळणारा भावस्पर्श इत्यादी. परंतु कलावंताचा आत्मशोध किंवा मर्मशोध यातून साकारला नाही. हा आत्मशोध त्यातील महत्त्वपूर्ण टप्प्यांसह आपल्या नेमक्या ललित गद्य लेखनातून साकार करण्याचे श्रेय प्रा. महेश एलकुंचवार यांना द्यावे लागेल.

प्रा. महेश एलकुंचवार हे समकालीन नाट्यसृष्टी-तील एक महत्त्वपूर्ण नाटककार आहेत. १९६७ पासून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांच्या नाट्यप्रवासाला सुरुवात झाली. 'सुलतान', 'झुंबर' या एकांकिका, त्यानंतर 'रुद्रवर्षा', 'गार्बो', 'वासनाकांड', 'पार्टी', असा त्यांचा दमदार प्रवास मध्ये काही काळ थांबलेला आहे. पुन्हा १९८२ पासून ते लिहू लागले. 'वाडा चिरेबंदी', 'आत्मकथा', 'प्रतिबिंब' तर अगदी अलीकडे निर्माण झालेले नाट्यत्रिदल 'वाडा चिरेबंदी - मग्न तळ्याकाठी - युगान्त'. हा मधला सात वर्षांचा नाट्यकृतींच्या प्रवासातील मौनाचा कालखंड का आला असावा याची कारणे स्वतः लेखकालाही अज्ञात आहेत अशी कबुली त्यांनी एका भाषणात देऊन ठेवलेली आहे.[१] मात्र त्यांच्या नाट्यप्रवासातील उत्तरार्धाची वैशिष्ट्ये शोधत असताना पूर्वी 'मानवी दुःखाची अटळता' जाणून घेताना 'मनाचा कर्कश तडफडाट' होत असे; तो आता होत नाही असे ते म्हणतात. कर्कश तडफडाट आणि दुःखाच्या अटळतेचा आत्ममग्न तरीही निमूट स्वीकार या कलावंत मनाच्या चिंतनशील वाटचालीच्या सगळ्या खुणा महेश एलकुंचवार यांच्या मोजक्या, पण वैशिष्ट्यपूर्ण अशा ललित गद्य लेखनातून प्रकटलेल्या आहेत.

कलेची व्याख्या करताना ते म्हणतात - 'जगत असताना कुठे दुखलं खुपलं, कुठे आनंद झाला म्हणजे आपण हुंकार देतो. तो हुंकार म्हणजे कला."[२] महेश एलकुंचवार यांचे ललित गद्यलेखन म्हणजे आत्म-शोधाच्या वाटेवरील व्यथावेदनांचे आणि आनंद व समाधानाचे असे हुंकार आहेत. 'मी'च्या अलवार शोधात संगीत, चित्र, चित्रपट, नाट्य आदींच्या स्पर्शखुणांबरोबर आत्मभानाचे रंग मिसळून एलकुंचवारांचे ललित गद्य लेखन सिद्ध होते. भोगलेल्या अनुभवांमधून साकारलेली प्रतिमासृष्टी नवनव्या अनुभवांमधील कंद नेमका हेरते; ज्यात संवेदनांना साक्षी मानून हळूहळू आत्मभानाकडे जाणे घडलेले असते. रस, रंग, स्पर्श, ध्वनी आणि स्वाद अशा इंद्रियसंवेदना एकवटून बाहेरून आत, अधिक आत आत असा प्रवास घडतो. तरीही कलावंत मनाचे 'मन रमवण्याचे' जे मुख्य खेळणे आहे ते आहे नाट्यलेखनाचे! दृश्य माध्यमावरील पकड घट्ट असल्यामुळे, कोणताही अनुभव गोचर करण्याची शक्ती ह्या कलावंत मनाला प्राप्त झालेली आहे. त्यामुळे विलक्षण आत्ममग्न अशा या ललित गद्यलेखनात दृश्य संवेदना टिपून पुढे पुढे जात राहणारे अनुभव जास्त भेटतात: उदा. अत्यंत प्रथितयश चित्रकाराच्या चित्रदर्शनाने जागणारे भाव, एखाद्या नाटकातील अनुभव, चित्रपटातील दीर्घकाळ स्मरणात कोरली गेलेली दृश्ये इत्यादी. त्यामधील चिंतनशीलता ही भावतप्त असली तरी कलावंताला आत्मशोध घेण्यास प्रवृत्त करणारी आहे. त्यातील मानवी जीवनातील खेचाखेच, ताणतणाव यांचे बहुआयामी दर्शन आत्मसाक्षात्काराच्या पायरीला पोचून जुन्या दृष्टीला अधिक प्रवाही, अधिक विशाल करणारे असल्यामुळे केवळ खाजगी वैयक्तिक अशा अनुभवांमधून साकारलेली प्रतिमासृष्टी नवनव्या अनुभवांमधील चैतनरूप नेमकेपणाने हेरते आणि शब्दांमध्ये पेलून अभिव्यक्त करते. त्यामुळेच त्यातून सचेतन अशा जीवनानुभवांचा व्यापक आणि सखोल, जटिल आणि व्यामिश्र असा शोध साकारताना दिसतो. अनेक भाववृत्ती त्यांच्या बहुपेडी स्पंदनांसह आणि अनुभव त्याच्या विविध पातळ्यांसह प्रकटून या ललित गद्याचे आंतरिक सामर्थ्य वाढवतो. एलकुंचवारांचे ललित गद्य म्हणजे 'महाराष्ट्र टाइम्स'च्या रविवार पुरवणीतून आलेले 'काळोखाची फुले' या शीर्षकाखालील नऊ लेख आणि 'अरण्यातील आत्मभान' हा 'सत्यकथा' दिवाळी १९८१ मधील लेख, तसेच 'मौज'च्या १९९० मधील दिवाळी अंकात आलेला 'गहकूटं विसङ्गितम्' हा लेख एवढेच आहे.

'काळोखाची फुले' मधील पहिला लेखच लहान आहे, पण विलक्षण प्रसरणशील असा भावार्थ लाभलेला आहे. दोमिएचे एक चित्र पाहून लेखकाला येणारा वैयक्तिक अनुभव भावार्त शब्दांमधून हळूहळू वाचकाच्या मनात मूळ स्पंदनासह झिरपत राहतो. लेखाचे नाव आहे 'ओझे' चित्रातही ओझे वाहणे आणि त्यामागील वेदना निमूट सोसणे हा भाव आहे. बाजारू चित्रकारांनी काढलेल्या स्त्रीसौंदर्याच्या चित्रासारखे हे चित्र नाही. येथेही स्त्रीचे चित्र आहे, पण अंगोपांगाचे 'आग्रही वळसे' नाहीत किंवा 'हडकलेल्या' शरीरात भासणारी 'सांकेतिक' कल्पना नाही. ती स्त्री स्थूल आहे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण ती स्थूलता 'सुखावर चरून पुष्ट झाल्या'सारखी नाही. शरीराचे ओझे, छातीशी कवटाळलेल्या धुण्याने भरलेल्या बादलीचे ओझे आणि चढ. माध्यान्हीची वेळ, चढणीचा मध्य आणि सोबतीला लुटूलुटू धावणारे चिमुकले मूल. त्याच्या आणि त्याच्या आईच्या प्रवासातील भावना वेगळ्या आणि प्रेरणाही वेगळ्या! त्या स्त्रीचा दुःख सोसणारा चेहरा, त्यावरील निमूटपणाचा भाव, एकाकीपणाने ओझे ओढण्यात जाणवणारी विकलता लेखकाला त्या अनुभवात सहभागी करून घेण्याइतकी जिवंत आहे. 'मी'ला वाटते, तिच्यावर वृक्ष होऊन 'हिरवीगार सावली' धरावी, अदृश्य हातांनी तिच्या कपाळावरचा घाम पुसावा, जमेल तेवढ्या सोबतीचे आश्वासन द्यावे. चित्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्या स्त्रीच्या चेहऱ्याला नाकडोळे नाहीत. दुःखाचा अबोलपणा आणि अनामपणा त्यातून ठळठळीतपणे जाणवावा. भोगलेल्या दुःखाच्या निष्ठुर खुणा जणू सर्वसामान्य माणसाच्या दुःखाशी नाते जोडणाऱ्या. 'मी'ला भासतो. "अबोल दुःखाचा समंजस स्वीकार." म्हणजे लेखकाला जवळचे वाटते आहे ते त्या दुःखाचे आत्ममग्न रूप! कांगावा करणारे, स्वतःबरोबर इतरांना पीडणारे आणि आयुष्याला कडूपणा आणणारे जे दुःख असते त्या जातीचे हे दुःख नाही. असे दुःख इतरांच्या स्पर्शानेही हलके होणारे नाही हे जाणवणे हेच यातील दुःखानुभवाचे तरल प्रसरण होय. माणसाचे दुःख हे त्याच्या मनाच्या जातकुळीवर ठरत असते आणि ते ज्याचे त्याने एकेकट्यानेच भोगायचे असते. चढण अर्धी पार पडलेली असली तरी संपलेली नाही, पुढे चढ वाढलेला आहे. सोबतीला मध्यान्हीचे ऊन आणि चिमुकले, यातनांची जाण नसणारे मूल. उन्हाचे तापदायक ओझे की ओल्या कपड्यांच्या भाराचे, कष्टाचे की चढणीचे, शरीराचे की मनाचे? बरोबर तप्त, परस्थ वातावरणात इवली पावले उमटवणारे मूल दुःख कमी करणारे की वाढवणारे? त्या निरागस सोबतीने निमूट, अबोल स्वीकाराचे बळ वाढले असेल की या निरागस कोवळ्या आयुष्यालाही ह्या जगातील उद्या क्रूरपणे होरपळून टाकणार म्हणून मातृहृदय भरून आले असेल? भावनेचे विविध दिशांनी येणारे, व्यामिश्रपणे जाणवणारे ताण शब्दांच्या मितव्ययामुळे अधिक गडद होतात. मानवी संबंध, रक्ताचे बंध हेच जीवनापेक्षा शाश्वत आहेत. तेच तर खरे ओझे आहे. दुःखही आत वळणारे, अंतर्मुख करणारे असावे ही दृष्टी त्यातूनही व्यक्त होत राहते. अगदी एकटेपणामुळे माणसाची संवादशक्तीच हरवून जावी, भाव मुखर करूच नयेत असे हे ओझे म्हणजे संपूर्ण तुटलेपणाच्या अनुभवाचे दडपण आहे. इथे आपल्या दुःखाचा अर्थ काय, एकाकीपणाचा अर्थ काय अशा शाश्वत प्रश्नांना आतून भिडण्याची धडपड आहे. दुःखही सजवून मांडणारी, कांगावा करून इतरांची सहानुभूती मिळवणारी माणसे स्वतःतून बाहेर पडू शकत नाहीत. इथे लेखकही आपल्या कोषातून पलीकडे जाण्याची, झेप घेण्याची धडपड करतो आहे. दुःख हा काही एकट्याचा अनुभव नाही. तो अटळ असला तरी समजावून घेता येतो, ती समजावून घेण्याची धडपड इथे दिसते. लेखकाची जी धडपड आहे ती दुःखाची नेमकी नस हेरण्याची आहे. इथे फक्त घटना महत्त्वाची नाही, फक्त बाह्य आकारापुरता अनुभवही महत्त्वाचा नाही. अनुभवाच्या कोंभाला भिडणे महत्त्वाचे आहे.

'पार्टी' या एलकुंचवारांच्या नाटकातील भारत म्हणतो - "मला हवा आहे प्रत्येक अनुभवात सतत ठणकत राहणारा, तडफडत राहणारा त्या अनुभवाचा हिरवागार लसलसता कोंभ. सगळा अनुभव सोलून काढून तेवढा कोंभ फक्त मला तळहातावर ठेवायचा आहे"[३] या ललित गद्यातील 'मी'ची धडपड नेमकी याच प्रकारची आहे. जणू काय असे अनुभव म्हणजे अनुभव घेणाऱ्या कलावंत व्यक्तिमत्त्वाचीच एक बाजू असते.

दुःखाच्या ज्या निमूट स्वीकाराबद्दल 'मी'ला खूप काही वाटते हाच दुःखाचा निमूट स्वीकार 'वाडा चिरेबंदी' मधील आईच्या स्वभावात दिसतो. प्रभाशी बोलताना आई म्हणते - "प्रभा, दुःख काय कोणास दाखवावयाची गोष्ट आहे का? बाई, आपलं आपल्याजवळ ठेवावं. अतीच झालं तर ह्या वाड्यास खूप अंधाऱ्या खोल्या आहे, त्यात गूपचूप डोळे गाळावू.... सुख मिळेना तेव्हा सुखास मीच समाधानानं निरोप दिला. जे मिळत नाही ते आपणच दूर लोटावू."[४] 'मग्न

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ

तळ्याकाठी' या दुसऱ्या भागात प्रभाही बोलत नाही. पण केस पूर्ण पिकलेली, श्वास लागलेल्या अवस्थेत घरभर फिरणारी, दिंडी दरवाजा उघडण्याचा निष्फळ प्रयत्न करणारी प्रभा मनाला अधिक भिडते. याच भागात भेटणारी परागची पत्नी नंदिनी हिनेही दुःखाची अटळता सहजपणे आणि अबोलपणे स्वीकारलेली दिसते. आत्मशोधातून गवसणारी, दुःखातही टिकणारी मनाची शांत अवस्था जी 'ओझे'मध्ये दिसते ती एलकुंचवारांच्या नव्या नाट्यत्रिदळात स्पष्टपणे जाणवते.

७ सप्टेंबर १९७५ ला प्रसिद्ध झालेले 'काळोखाची फुले'मधील तीन क्रमांकाचे ललित गद्य भारतीय संस्कृतीतील प्रेताच्या दाहसंस्काराची तर्ककठोरता अधोरेखित करते. "नश्वरतेची रोखठोक समज" त्यामधून व्यक्त होते. एका स्नेह्याच्या मृत्यूनंतर राखेत जळून शुभ्र झालेल्या हाडातून हिरवाकंच लसलसलेला कोंभ पाहताच 'मी'चे देशी संस्कार पचवलेले मन जागृत होते.

"नष्टप्राण झालेल्या, जाळून राख झालेल्या देहात जीवनरसाची ही खूण वाढली ती कशी? माणूस मेले की जीवनरस आटतो ना? की खरेच संस्कारांची, इच्छांची, आसक्तींची मुळे इतक्या खोलवर, हाडांच्या अंतर्भागापर्यंत भिनलेली असतात?" इथे मृत्यूचे जीवनावेगळे अस्तित्व लेखकाला मान्यच नाही. मृत्यूचा अटळपणा जितका खरा तितका संस्कारांचा खोलपणाही खरा! जीवनविसर्जनातून नवे जीवन अंकुरते याचाच हा जणू भावात्म प्रत्यय. इथे प्रकटते ती जीवनसातत्याचा दिलासा देणारी भारतीय जाणीव!

५ ऑक्टो. १९७५ च्या 'महाराष्ट्र टाइम्स' मधील पाचव्या लेखांकामध्ये आत्ममग्न होऊन लेखक आपल्याच अनुभवांना तपासताना दिसतो. एका मुजरेवालीच्या हसण्याबोलण्याच्या 'उत्सवा'चे वर्णन करताना लेखकाला प्रश्न पडतो - "जे भ्रष्ट जीवन तिच्या वाट्याला आले होते त्यात ही दिवाळी तिला कशी करता येत होती?" ललित गद्यातून त्या वाङ्मयप्रकाराच्या विलक्षण आत्मनिष्ठरूपामुळे लेखकाची अस्सल जीवनदृष्टी अतिशय टोकदारपणे व्यक्त होत राहते. तप्त भावोत्कटतेमुळे विचारालाच भावमूल्य (Lyrical value) प्राप्त होते; जे ललित गद्याची परिणामकारकता निश्चित करीत असते. पूर्वस्मृती, मानवी मनाची सतत चाललेली घडमोड, अनुभवाचा त्या त्या क्षणी जाणवणारा अर्थ अशी आंतरिक चित्रे कॅमेऱ्याने टिपावी तशी आपल्यापुढे साकारतात. हे आंतरिक वास्तव रूढ, गुळगुळीत भाषेत व्यक्तच होऊ शकत नाही. म्हणून ते प्रतिमाश्रयी बनते. म्हणूनच ती बालपणी दिसलेली मुजरेवाली गायिका पुढे काही वर्षांनी भेटते तेव्हा "फुलून आलेल्या तृप्त मध्यरात्रीसारखी ती शांत दिसत होती." हे आयुष्य सोडून द्यावेसे वाटले नाही कां, या प्रश्नावर तिने दिलेले उत्तरही विलक्षण आहे. "मी बाईमाणूस... जे वाट्याला आले ते स्वीकारावयाचे अशी इथे रीत. मी ते केले. मला दुःख नाही, उलट समाधानच आहे. माझा वेश्याधर्म मी नीट पाळला." त्यातील 'वेश्याधर्म' हा शब्द ऐकताच लेखकाच्या मनाच्या तारा विलक्षण झंकृत होऊन जातात. ही बाई निघून गेली तरी त्या शब्दाने पाठ न सोडल्यामुळे लेखक अस्वस्थ होऊन जातात. एका अनावर क्षणी लेखकाला गूढ सत्य गवसते..... "आत्मज्ञानात हा स्वीकार अंतर्भूतच आहे. नाही तरी ह्या स्वीकाराचा क्षण एखादे व्रत घ्यावे तसा तर खडतर असतोच. पण तेव्हा स्वतःच्या वाहण्यातले शंकांचे अडसर दूर होऊन वाहणेही मुक्त होते....." ती स्त्रीही मोठीच म्हणावी लागेल. दास्यात अडकून पडली असून दास्याच्या काळोखात ती स्वतःच 'ज्योत होऊन' वावरली; "जे तुच्छ, त्याज्य, घृणास्पद त्याला धर्मरूप तिने दिले." लेखकाला तर हे तिने स्वीकारलेले व्रताचे बंधनच वाटते. तिचे वर्तन मुमुक्षूसारखे, पार्थिवाला विसर्जित करणाऱ्याचे आहे.

एलकुंचवार जणू काय सतत टिपत आहेत ते अनुभवांमधील ताणांचे आंतरिक नाट्य. सामान्य, घृणास्पद भासणाऱ्या जीवनाचाही सहज स्वीकार केला तर तेही व्रत ठरते आणि मग मोक्ष वेगळा कुठे उरणार? आयुष्याचे हे वाहतेपण, 'नदीपण' स्वीकारणे लेखकाला जवळचे वाटले आहे. जे वाट्याला आले तेवढेच स्वीकारणे, हे जीवनाचे मर्म आहे ही दृष्टी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एलकुंचवारांच्या पुढील नाट्यप्रवासात दिसते. जे वाट्याला आले त्याविषयी आक्रंदून जगणे चुकत नाही, भोग बदलत नाही. म्हणून दुःखाचा निमूट स्वीकार हीच जीवनदृष्टी इथे पुन्हा पुन्हा अधोरेखित होते. 'मग्न तळ्याकाठी' मधील पराग तुरुंगवासही असाच स्वीकारतो आणि 'युगान्त'मध्ये दिसतो तो भोगून भोगातीत झालेला पराग. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील सगळे हीणच जणू त्या तुरुंगवासात जळून गेलेले आहे. स्वप्नस्थ तळ्याच्या मागे धावण्यापेक्षा जेवढे लाभले तेवढेच आपले तळे असे म्हणून त्याने जगणे स्वीकारले आहे. तुच्छ, त्याज्य असे जीवन वाट्याला आले तरी स्वतः जळून ज्योतीसारखा प्रकाश द्यावा हेच लेखकाला जाणवलेले तत्त्व या अलीकडच्या नाट्यकृतींमधील व्यक्तिरेखांमध्येही दिसते.

१९ ऑक्टो १९७५ च्या महाराष्ट्र टाइम्समधील 'काळोखाची फुले' या शीर्षकांतर्गत आलेला लेख निर्माण होण्याचे निमित्त आहे आरसा. घरी जे वातावरण होते ते आरसा पाहण्याला पोषक नव्हते. त्या काळानुसार आरशात पाहणे म्हणजे नाटक-सिनेमात जाणे असे होते. त्यामुळे स्वतःच्याच हजारो प्रतिमा अवतीभवती खालीवर पाहून होणारा आनंद सर्वप्रथम इंदूरच्या आरसेमहालात, नंतर 'मुगल-ए-आझम' सारख्या चित्रपटातील अनारकलीची आरशात रूपे पाहणाऱ्या सलीमच्या रूपाने आणि तिसऱ्यांदा जत्रेतील तऱ्हेतऱ्हेची रूपे दाखविणाऱ्या आरशाच्या खोलीत 'मी'ला भेटतो. या आनंदात मन गरगरा फिरते. आपला 'सुरूपतेचा ताठा' वेग वाढवून 'भिंगरी' झाल्याचा अनुभव या लेखाच्या सुरुवातीला मांडला गेलेला आहे. डोळे बिघडले म्हणून डॉक्टरांकडे जाऊन औषध घालून डोळे मिटून बसल्यानंतर जे जे वादळ मनात घोंगावले ते लेखकाने या लेखाच्या उत्तरार्धात शब्दबद्ध केले आहे. डोळेच नसणे म्हणजे अंधारात चाचपडणे हे कळताच मनाला आतून जाणवते की, "दुसऱ्यांशिवाय मला जगणे शक्य नव्हते". आरशातले प्रतिबिंब हीही शेवटी फोल गोष्टच असते. आपल्यासाठी, आपल्या जगण्यासाठी इतरांच्या डोळ्यात आपण प्रतिमा शोधत असतो आणि इतरांना केवळ 'आरसेपण' वहाल करून 'निर्धास्त' होत असतो हे त्या क्षणी या कलावंत मनाला जाणवते. आत्महत्येपर्यंत विचार पोचताच दुसऱ्या प्रकारचा अंधार जाणवला, अस्तित्वच नाहीसे होण्याचा धोका जाणवला.

"जिवंतपणी अस्तित्व असून अंधार आणि मृत्यूनंतर तर काहीच नाही. आपण काहीच नसणे ह्यापेक्षा अंधारे आंधळे अस्तित्व मला मंजूर होते."

ह्या ठिकाणी खरा साक्षात्कार आहे तो फसगतीचा. इतके दिवस इतक्या लोकांना आपले मानले, त्यांनी दिलेल्या प्रेमावर, यशावर विसंबलो, पण त्या गोष्टी इतक्या फोल ठरल्या की "अंधारून आलेल्या मनाचा एकसुद्धा कोपरा उजळून निघू नये." या कलावंताला इथेच फार मोठा आत्मसाक्षात्कार झालेला आहे. आणि तो साक्षात्कार पुढे 'आत्मकथा' ह्या नाटकात राजाध्यक्षांच्या शब्दांमधून असाच पाझरत राहिलेला आहे.

"माणसामाणसांमध्ये ह्याहीपेक्षा जास्त अंतर आहे, प्रज्ञा, आणि त्यांना एकमेकांपासून मिळणारा प्रकाशही तितकाच अनित्य आहे."[५]

या आरशाच्या अनुभवातून होणाऱ्या आत्मसाक्षात्काराचे दुसरे टोक 'प्रतिबिंब'मध्ये सापडते. त्यामध्ये बाई म्हणतात - "अहो शरीर आहे हे फक्त दोनच गोष्टींमुळे सिद्ध होऊ शकतं म्हटलं. एक प्रतिबिंबामुळे. दोन, दुसऱ्या शरीरामुळे. अहो एक वस्तू दुसऱ्याच वस्तूमुळे सिद्ध होते. नाहीतर एका वस्तूला अर्थच काय उरल्या?"[६] "आरशात काय तुम्हाला तुमचं मन दिसतं, का हृदय, का आत्मा?"[७]

थोडक्यात, कलावंत म्हणून झालेला आत्मसाक्षात्कार महेश एलकुंचवार यांना स्वतःवर खिळलेली दृष्टी सोडवून आत वळवून गेला. यशाचा पोकळपणा जाणवून देणारा साक्षात्कार प्रेम, द्वेष याही 'स्वतःच्याच प्रतिमा' हे ज्ञान देऊन गेला आणि कलावंताचा कायापालटच झाला.

सातव्या लेखामध्ये एक साधा अनुभव मध्यभागी आहे. एक स्नेह्याच्या मतिमंद मुलाशी होणाऱ्या वागणुकीमुळे लेखकाचे अस्वस्थ होणे हाच तो अनुभव! अंधाऱ्या क्षणी झालेल्या आत्मसाक्षात्कारामुळे मनाचे अपंगत्व स्वीकारणे जगाला अवघड का वाटावे हा प्रश्न

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मनात निर्माण होतो आणि त्याचबरोबर आपल्या परीने त्याचे उत्तरही!

"...... की असल्या व्यक्तींवरचा राग हा भीतीपोटी जन्मलेला असतो? हायडेगरने सांगितल्याप्रमाणे आपलेच ते कुठेतरी तिरस्करणीय प्रतिबिंब असते म्हणून तर आपण भयभीत होऊन निकरावर येत नाही ना? धर्म, संस्कृतीला घातक ठरणाऱ्या ह्या गोष्टी आपण म्हणतो आणि धर्म व संस्कृतीची व्याख्या कमालीची क्षुद्र करतो. जिथे करुणा नाही तो धर्म धर्म काय व संस्कृती संस्कृती तरी? अखेर करुणेच्या महासमुद्रातच सर्व धर्मांची कमळे उमलतात ना?" हा लेख प्रसिद्ध झालेला आहे, २३ नोव्हें. १९७५च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये. हीच खोल, अथांग करुणा 'पार्टी'मधल्या भारतलाही मोलाची वाटते. कलावंताचे 'प्रचंड मन' कसे असावे याचे वर्णन करताना तो म्हणतो - "खोल आणि अथांग करुणेनं भरलेलं. जीवनाच्या सगळ्या अंगांना क्षमा करून त्याला हृदयाशी कवळणारं. अखेर करुणेच्या महासमुद्रात सर्व धर्मांची अन् कलांची कमळं उमलतात."[८]

७ डिसेंबर १९७५च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये आलेल्या आठ क्रमांकाच्या ललित गद्यात एकाच अनुभवाच्या पायऱ्या ठराव्या अशा तीन आठवणी आणि त्यानिमित्ताने घडणारे आत्मपरीक्षण आहे. एका पावसाळी अंधारल्या क्षणामध्ये चिखल, तुटकी चप्पल आणि सुखाला सरावलेले शिव्याशाप देणारे मन अशा अवस्थेत मन आठवते आहे घडून गेलेल्या चुका, दुष्कृत्ये! आणि "एकाकीपण अगदी दीनदुबळे, लुळेपांगळे होऊन गेले." त्या दुःखाच्या क्षणी प्रकाशासाठी मनाचा आक्रोश सुरू असताना 'रत्नदीपांनी चमकणाऱ्या झुंबराचा' अनुभव देणारे काजवे दिसले, निघून गेले आणि पुन्हा फक्त अंधार उरला! बाहेरचा आणि आतलाही!

काही वर्षांनी ऐन तारुण्यात मृत्यूशी झगडणाऱ्या मित्राचे शेवटचे असंबद्ध वाटणारे शब्द ऐकले. विसरून गेलेले ते विनमहत्त्वाचे तपशील म्हणजे "जणू त्याच्या जीवनात प्रकाशणारे ते आणि तेवढेच शब्द होते." भर दिवसा दुपारी' तो दिवे लावा म्हणून आक्रंदत होता.

मनाच्या त्या अस्वस्थ अवस्थेत लेखक सत्यजितच्या 'अपराजितो' चित्रपटाला गेल्यावर त्यातील अपूऱ्या आईचे मरणक्षण, तिचे धडपडत मुलाची हाक ऐकत उभे राहणे, झुडुपातून काजवे दिसणे आणि पुन्हा नाहीसे होणे हे लेखकाच्या मनात अस्वस्थता निर्माण करते. "आपल्याला न कळणारे, न दिसणारे, सतत काही आपल्या पाठीमागे, आपल्याकडे पाहतच उभे आहे असे भान झगझगीत मला आले होते." हे भान नव्हे, हा तर साक्षात्काराचा क्षण आहे.

"खरेच केवढी अंधारयात्रा अखेर सगळ्यांना साजरी करायची असते जीवनभर. भलेबुरे चार अनुभव येतात त्याने जीवन उजळून निघाले नि अंधार नष्ट झाला असे होत नाहीच तर! जीवात्म्याची चिरयात्रा अशी काजळ-काळ्या काळोखाने भरलेली आहे? जीवनापूर्वी व जीवनानंतरच्या अखंड काळोखात मध्येच काजव्याप्रमाणे सुंदर पण व्यर्थ चमकून जे गेले ते म्हणजे जीवन का? आणि त्याला घट्ट धरून राहण्याच्या अट्टाहासापायी आपण चिरंतन काळोखाची ओळख दूर लोटतो? शेवटी जीवन लखलखून गेले तरी पायाखालची वाट दिसत नाहीच तर!"

आशेचे आणि विफलतेचे हे आत्मप्रत्ययी क्षण एलकुंचवारांच्या कलाविष्काराला शाश्वतोन्मुख करताना दिसतात. जे नको वाटते पण मनात घट्ट रुतून बसले आहे ते आणि जे हवे वाटते, स्मरणाने पुन्हापुन्हा भोगावेसे वाटते ते, त्यांची घट्ट जाणीव होत राहणे हा प्रतीतिधर्मी मनाचा सहजभाव आहे. मानसिक आणि आत्मिक पातळीवर चालणारी व्यामिश्र अनुभूतींची जा–ये शब्दबद्ध करण्यासाठी लयीचा आश्रय करणारी विलक्षण अंतर्मुख लीनता, कोवळीक आणि जिवंत जागरूक वृत्ती लागत असते तीच येथे स्पष्ट होत गेलेली आहे. सत्यशोधनाचे वळ अशा आत्मशोधानेच प्राप्त होत असते. दुःखस्वीकाराचे अनेक पवित्रे असतात. कोणी त्या दुःखाला चुकविणारी वाट धरतो, कुणी त्याच्या नुसत्या दर्शनाने असहाय होतो, कोणी आक्रोश करतो, तर कोणी त्या दुःखस्वीकारातून अंधाराचा प्रत्यय घेत पुन्हा अंधार चिरत राहण्याचा प्रयत्न करतो. पण सगळीकडे दिसते ती फक्त यातायात! त्यातून सुटका नाही. एलकुंचवारांचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काजव्यांचा प्रत्यय आणि 'प्रकाश गेला, तिमिर हरपला' अशी केशवसुतांची जाणीव एकात्म होते, मात्र केशवसुतांना अंधार दूर करावासा वाटतो, एलकुंचवारांना त्या अंधारप्रत्ययात अखंड वाहणाऱ्या काळाचे दर्शन घडते. त्यात आत्मविसर्जन केल्याशिवाय गती नाही असा गूढ अनुभव येतो.

४ जानेवारी १९७६ च्या महाराष्ट्र टाइम्समधील नवव्या आणि शेवटच्या लेखांकात आपली क्षुद्र सुखदुःखे, विराण, ओके ओके जीवन यांचा जसा प्रत्यय येतो तसाच दुःखाच्या मिजारीचा, आपण करीत असलेल्या त्याच्या कौतुकाचा प्रत्यय येतो. त्याबरोबर अंधाऱ्या अनंत विस्ताराच्या अफाटपणाची जाणीव होते. तसेच मनाच्या, सर्व अनुभव सामावून घेण्याच्या वृत्तीचीही! सौंदर्याने मुग्ध होण्याचा ध्यास असल्यामुळेच तर हे कलावंत मन जीवनातील शोकात्म भानाकडे खेचले जात नसेल ना? दुःख आणि तरल अशा कलाभानाचे नाते फार सनातन आहे. कलावंताने भोवतालच्या जगाचा गलबला सोडला की नेणिवेचा अंधार हा प्रत्ययकारी होत असतो. ज्याचा जसा जीवनानुभव तशीच त्याची जीवनदृष्टी. एलकुंचवारांच्या जीवनदृष्टीचा प्रत्यय इथे साक्षात् येतो. जीवनाचे श्रेय गवसणे किंवा श्रेयाचे आकलन होणे यापेक्षा त्यांचा अनुभव वेगळा आहे. जीवनाची क्षणिकता, प्रवाहीपणा आणि त्याची दुःखानुभवाचे दान देण्याची क्षमता त्यांना जाणवलेली आहे. सर्वसामान्य माणसाला फक्त सुखाची आकांक्षा असते; पण सुखे हा फक्त अंधारातील काजव्यांचा क्षणिक चमकणारा प्रकाश असतो. तो फसवा नसतो, पण अंधार अधिक गहिरा करणारा असतो. दुःख हीच त्यांची जीवनचैतन्यजाणीव आहे. ही दुःखप्रेमाची वृत्ती नाही, आपले निराळेपण धारण करण्यासाठी स्वीकारलेली फसवी, नकली पोझ नाही, हा दुःखाचा अटळतेचा सहज स्वीकार आहे. त्यासाठीही एक प्रकारच्या कणखरपणाची, खंबीर वृत्तीची गरज असते. दुःखाच्या फुफाट्याच्या अनुभवातून फुंकर घालण्याची इच्छा काजळत नसते, पण दुःखाचा अंतर्वेधी प्रत्यय आला की एकटेपणा प्रबळ होत असतो. गोविंदाग्रजांचा एकटेपणाचा प्रत्यय असाच होता.

दिक्कालांनी, अज्ञातांनी बांधताच पाय
एकलकोंडे, अनंत कविमन रडे धायधाय

महेश एलकुंचवारांचा आत्मशोध इथे जणू काय काही काळापुरता पूर्ण होतो. त्यांच्या दुःखजाणिवेला सखोलता व झोंबरी आर्द्रता लाभते. दिशेचे आणि काळाचे बंधन गळून पडते, जीवन उलगडते आणि मरणाचाही अर्थ कळतो. आत्मचिंतनाची वाट या काळोखाच्या आकलनातूनच एलकुंचवारांना गवसलेली आहे. 'आत्मकथा' मधील राजाध्यक्षांना देवयानीतारामंडळाच्या निमित्ताने झालेला साक्षात्कार आणि लेखकाला काजव्यांच्या निमित्ताने होणारा साक्षात्कार यात एक विलक्षण नाते आहे. एक आश्वासक, क्षणापुरता का होईना प्रकाश स्वीकारताना माणसामाणसातील अंतर आणि माणसापासून माणसाला मिळणाऱ्या प्रकाशाची अनित्यता यांची जाणीव 'आत्मकथे'त आहे तशीच 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' आणि 'युगान्त' मध्येही आहे. एलकुंचवारांच्या या नाट्यत्रिदलामागे आत्मचिंतनाची आणखी मोठी झेप आहे. काळोखाकडून अज्ञेयाकडे होणाऱ्या प्रवासाची ती वाट आहे. तुटलेपणा, एकटेपणा, गहिरी विषण्णता यातून आत्मप्रतीतीच्या गर्भसौंदर्याचे प्रतीक म्हणून तळ्याची प्रतिमा 'मग्न तळ्याकाठी'मध्ये साकारते. आभाळ आणि पृथ्वी यांच्याशी निगडित असणारे तारकांनी खचणारे काळोखी रूप 'आत्मकथा' आणि 'मग्न तळ्याकाठी'मध्ये साकारते व अज्ञेयाच्या खुणांनी मनाला अधिक व्याकूळ करते.

एलकुंचवारांना आता मृत्यू महत्त्वाचा व अर्थपूर्ण वाटतो. "वाडा चिरेबंदी" पासून ही कहाणी मृत्यूच्या सावटात सुरू होते तर पुढील दोन भागांमध्ये प्रभा आणि चंदूच्या मृत्यूने अधिक अर्थपूर्ण होते.

नवव्या लेखांकात आत्मशोधाची पाती विलक्षण धारदार झालेली दिसतात. माणसाचे 'वळवळणे', त्यांचे 'किरटे व्यवहार', 'वीतभर' जीवन विमानातून दिसले तेव्हा मन सांगते - "त्या क्षुद्रातलाच तू एक क्षुद्र. क्षुद्र, किरट्या संबंधाने तू त्यांच्याशी बांधला गेला आहे." आत्मपरीक्षण करताना गवसते की, 'आंधळी श्रद्धा' 'बुद्धीच्या दर्पाने' हास्यास्पद ठरवली, पण "अश्रद्धा तरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जळजळीत दाहक व्रतासारखी आपण पेटती ठेवली का ?" आत्मभान व त्यातून घडलेला आत्मसाक्षात्कार यातून येणारी व्याकुळ, निःसंगवृत्ती इथे काठोकाठ भरून उरलेली आहे.

"कुठलेच दुःख लहान वाटेना व मोठेही. ते फक्त असते. सुखे असतात तसेच असते - व सुखांसारखेच ते संपतेही. पण त्याची तेवढी आपण मिजास सांभाळतो! केवढे त्याला कौतुकाचे मखर घालतो.... सजतेच ते, उजळून नाही निघत. ह्या क्षणजीवी प्रकाशासारखेच ते भंगुर होते. अंतर्बाह्य उजळून निघायचे तर ह्या चिरंतन काळ्या प्रकाशाने भरलेल्या प्रदेशाचे आमंत्रण नाही नाकारता येणार."

'अरण्यातील आत्मभान' हा सत्यकथेच्या १९८१ सालच्या दिवाळी अंकात प्रकाशित झालेला लेख म्हणजे एलकुंचवारांच्या ललितगद्यलेखनातील शिखर आहे. लेखकाच्या जीवनदृष्टीची नेमकी कळच त्यात साकारली आहे. कलावंत स्पर्धेच्या रिंगणात उतरला की या व्यवहारातील स्पर्धेचे नियम त्याला नियंत्रित करू लागतात. स्पर्धेत तो थकला की मागून येणारे त्याला रिंगणाबाहेर ढकलून पुढे जातात. ही वाट सोडून बाजूला सरणे हा सोपा मार्ग. कठोर, खडतर मार्ग म्हणजे कलावंताने स्वतःच शोधलेली वाट. एकदा हा शोध सुरू झाला की 'आत्मप्रत्ययाने भरलेले हृदय' एवढीच साथ. कधी कधी अर्ध्या वाटेत थकवा येतो, अंधार पेरत येतो. 'विजनवासात' जीवनाची 'अखेर' होण्याचे ऐश्वर्य 'फक्त कलावंताच्याच नशिबी असते', पण अनेक लोक इकडे फिरकत नाहीत तर 'प्रस्थापित मूल्यव्यवस्थेशी' तडजोड करू लागतात.

जीवनातील श्रेय आणि प्रेय यांचे दर्शन एलकुंचवार या लेखात घडवतात. अशीच माणसे त्यांनी आपल्या 'मग्न तळ्याकाठी' व 'युगान्त' मध्ये चितारलेली दिसतात— जी जगाच्या रूढ व्यवहारी वाटेने जात नाहीत. मनाला मरू देत फक्त गोंगाटात जीवन जगत नाहीत. त्यांच्या 'वाडा चिरेबंदी' मधील प्रभा शिक्षणाचा ध्यास घेते. तोही संपून जातो तेव्हा तडफड तडफड होऊन ती आपले मनच मिटून घेते. आत्मनाशाच्या वाटेवरून चालत जाते. अभय पैसा पैसा करीत स्वदेशात जगणे पत्करत नाही. परदेशात जाऊन संशोधनाची, प्रलोभनांना दूर सारणारी आणि आत्मत्व उजळ करणारी वाट तो धरतो. अर्थात् त्याला यश, मानसन्मान मिळतात असे नाही. परागची वाट तर खऱ्याखुऱ्या आत्मविश्वासाची वाट आहे. अभयला मुळे पूर्ण उखडून परदेशात रुजवता आली नाहीत. तर परागला वेगळाच साक्षात्कार झाला. "ह्या सगळ्या घटनेचाच मी एक भाग आहे" असे मानल्याबरोबर त्याची तडफडच संपली नंदिनीचा आत्मप्रत्यय हीच परागची साथ-सोबत! त्यामुळे त्याला वाळवंट तुडवून जाण्याचे बळ प्राप्त झालेले आहे. हे त्याचे आत्मप्रचीतीचे बळ आहे. शेवटच्या क्षणाला अशा माणसाला कृतार्थता लाभते, त्याचे दुःख, त्याच्या यातना त्याला अंधाराशी एकरूप होण्याचे बळ देतात. ज्या 'विसर्जना'ला एलकुंचवार महत्त्व देतात ते आत्मविसर्जन परागला साधले आहे. कारण त्याला जीवनाच्या अखंडतेचा, सातत्याचा खरा अर्थ गवसलेला आहे. याउलट चंदूला "सुख नाही, तळं नाही, हे शरीर अन् त्याच्या आतली तडफड फक्त खरी" हाच प्रत्यय येतो. त्याला विसर्जनाचा खरा अर्थ गवसत नाही.

याहीपल्याड जाऊन अंतरीचे भाव काव्यासारखे उत्कटपणे व्यक्त करणारा, अस्तरासारखी चिंतनशीलता जाणवून देणारा आणि व्यक्तिमत्त्वाच्या आंतरपाकळीचे दर्शन घडविणारा ललित लेख 'मौज'च्या १९९० सालच्या दिवाळी अंकात महेश एलकुंचवारांनी लिहिला- 'गहकूटं विसङ्गितम्'. एका कलासक्त माणसाची आंतरिक सूक्ष्म आवर्तने फार साध्या तरीही धारदार शब्दात अवतरली. 'घर' या प्रतिमेभोवती गरगरत गरगरत घराची अतूट ओढ, त्यामधून सुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या मनाची उलघाल असे सूक्ष्म ताण एलकुंचवार टिपतात. लेखकाच्या मनाच्या खोल तळाशी दडलेले 'घर' नावाचे आठवणींचे स्वप्न भंगते, मन विंधून टाकते. या "अचल, अचेतन घराच्या, झाडांच्या, रस्त्यांच्या आठवणीने" जखमी झालेले मन अनेकदा शांत झाले इतके ते घराचे स्वप्नही 'मी'ला प्रिय होते. घर म्हणजे खोल भूतकाळात अनुभवलेल्या मायेचा स्पर्श आहे. ज्याला जीवनात पारखे व्हावे लागले तरी विसरता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आलेले नाही. आणि पारखे होणे म्हणजे ओरबाडले जाणे होते. इतरांच्या बाबतीत असे घडत नाही म्हणून 'घर' ही लेखकाच्या मनाची भळभळती वेदना ठरली. या वेदनेचे पाझर शब्दाशब्दातून अलगद भेटत राहतात. सुरुवातीला या आठवणीने होणारी तडफड, नंतरचा स्वीकार आणि आता विसर्जन हे सारे भाव शब्दाशब्दात गोठवून ठेवलेले दिसतात. जे घर स्वतःचे नव्हते, पण ज्या घरात स्वप्नांची जडणघडण झाली, वडिलांचे संस्कारांमधून जाणवणारे प्रेम, आईच्या डोळ्यातून सतत तेवत राहिलेले प्रेम त्या घराच्या दारात, भिंतीत साठून राहिले होते. म्हणून एकच असोशी होती, त्या घराच्या भिंतीवरून, दारावरून हात फिरवावयाची "आधीचे ओळखीचे जे जे शिल्लक असेल त्याला स्पर्श करायचा होता."

खरे तर जे जे भोगावे लागले, जे वाट्याला आले ते फक्त सुंदरच होते असे नाही. हा एकलेपणा असह्य झाला की लेखकाची नेणीव जणू त्याच्या आदर्श तळघरात दडलेल्या गोड वास्तव आठवणींची दारे उघडून त्यातून कुंदपणा नाहीसा करण्याचा प्रयत्न करते. बाह्य जगाशी झगडण्यासाठी आंतरिक भावजीवनातील यशस्वीता आवश्यक असते. भोवतालच्या भयाचा परिहार होण्यासाठी सच्ची अनुभूती असावी लागते. यातनेचा निडर, वेगुमान स्वीकार करताना कुठल्यातरी चैतन्याचे साह्य घ्यावे लागते. एलकुंचवारांच्या मनातील 'घर' हे त्या चैतन्याने भारलेले घर आहे. आपले भावविश्वच वेगळे आहे याची जाणीव एलकुंचवारांनाही आहे असे स्पष्ट जाणवते. म्हणूनच ते स्वतःचाच शोध घेऊ पाहतात. भावंडांना ज्या घराबद्दल काही आठवत नाही ते आपल्याच मनामध्ये ठाण मांडून का बसलेले आहे हे त्यांनी शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

"खरी गोष्ट अशी होती की ह्या सर्वांचे घर सुटले ते अगदी सहजगत्या, नैसर्गिकपणे. झाडाची वाळलेली साल अलगद गळून पडावी तसे ते घरापासून आपोआप गळून पडले. जमिनीतून उचकटून त्यांची कोणाची मुळे धक्क्याने दुखावली गेली नव्हती; ती अलगदपणे सुटावली होती. छोटे रोप अलगद सोडवून तयार जमिनीत पुन्हा त्याची रोवणी करावी तसे त्यांच्या जीवनात झाले होते. नव्या आयुष्यात, नव्या जमिनीत त्यांनी आपली मुळे अलगद रुजवली. त्यांचे सगळ्यांचे घनदाट डेरेदार वृक्ष झाले व खूप लोकांना ते सावली देत आहेत. मला मात्र पारव्याच्या जमिनीतून एकदा उखडून काढल्यावर पुन्हा कधीच कुठे मुळे रुजवता आली नाहीत. कोरड्या पडलेल्या नाल्याशेजारी मुळे उघडी पडलेल्या ताडासारखे आपण आहोत असे मला एकेकदा वाटते. त्याची सावली किती पडणार? पूर्वी आत्मकरुणेने मन भरून येई. आता वस्तुस्थिती शांतपणे स्वीकारता येते. सवय म्हणून आणि ती बदलता येत नाही म्हणूनही. अखेर सार्वभौम जीवनाचा हाही एक आविष्कार. तो आनंदाने स्वीकारला."

हीच घरासंबंधीची व्यथा 'रुद्रवर्षा'मध्ये यशवंतही बोलून दाखवतो. चौदा वर्षांनी परतल्यानंतर जिथे आपण आश्रित म्हणून जगलो त्या घरातही जुन्या खुणा तो शोधत राहतो.

"मला हे घर पाहायचं होतं. तुला पाहायचं होतं. काकूंना भेटायचं होतं. डॉक्टरांना भेटायचं होतं. दुःखद असलं तरी माझं बालपण इथं शोधायचं होतं मला."[१] स्वतःचे घर दिल्लीसारख्या शहरात निर्माण करूनही त्या घराच्या भिंतींना 'आत्मा' नाही असे त्याला जाणवत राहते. 'गार्बो'मधला पॅन्झीही घर उरलेले नसून 'घरी जायचे' असे सतत म्हणत राहतो. त्याला घर नाही, पण घर म्हणजे त्याच्या मनीमानसी दडलेली शांतीची आणि विसाव्याची प्रतिमा आहे. त्यालाही त्याचे गरीब आईबाप प्रेम देऊ शकलेले नाहीत, पण तरीही 'घर' या कल्पनेचा त्याला मोह आहे. 'युगान्त'मध्ये अभयला पुन्हा परतत असताना आपल्याला घर नाही अशी जाणीव होते. कारण घर म्हणजे नुसत्या भिंती नसतातच. अभय परागला सांगतो - "तू, वहिनी, बाळ - तुमचं एक अभेद्य घर आहे स्वतःचं. स्वतंत्र. फक्त तुमचं. तुमचं, तिघांचं. त्यात चवथ्याला प्रवेश नाही....."

'वाडा चिरेबंदी' मधला सुधीरही दूर गावातल्या पडक्या वाड्यात आपले हक्काचे घर शोधतो आहे. तर त्याच वाड्यात प्रभाला हा वाडा 'खाऊन टाकील मला' अशी भीती वाटते. घर मनातल्या, खोल दडलेल्या जाणिवांनी निर्माण होत असते. एलकुंचवारांच्या ललित

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गद्यात दडलेले 'घर' हे मनातल्या जाणिवांचे, बालपणीच्या मायेचे व आधाराचे आहे. घर आणि मानवी मन यांचे संबंध फार सनातन आहेत. निरागसतेचे, गूढ असंज्ञ मनात दडलेल्या स्वप्नांचे रंग त्यात मिसळतात. आजच्या एकाकी, दुभंगलेल्या जीवनात ज्या निरागस आणि कोवळ्या सर्जनशील जीवनप्रेरणेची गरज असते त्यासाठी 'घर'सारखी मायेची, जिव्हाळ्याची दुसरी प्रतिमा नाही.

महेश एलकुंचवारांच्या या ललित गद्यात तर त्यांच्या घराचा विशिष्ट गंधही सामावलेला आहे. त्या गंधाचा आधार घेऊनच मन पुन्हा पुन्हा भूतकालीन मायाममतेच्या उबाऱ्यात शिरत असते. आठवणींचा खजिना दृष्टी, श्रुती, गंध अशा संवेदनांमधून तिथे खुला होत असतो. बक्षीस मिळालेल्या कलदार रुपयांची खणखण, अंगणातील गोवऱ्यांच्या जगरात भाजलेल्या केकचा 'घरगुती खमंग वास', पेटीत दडून राहिलेला कस्तुरीचा गंध अशी ही सारी इंद्रियसंवेदनांची रूपे म्हणजे सुळकन् निसटून गेलेल्या बालपणाची प्रतिमामालिका आहे. आईचे निरोप देणारे डोळे 'पाठीला कायमचे चिकटले आहेत.' हा तर एका विलक्षण वेदनेचा हुंकार आहे, पण आक्रोश मात्र नाही. समुद्राची अस्पष्ट गाजही त्याच्या खोलीची जाणीव करून देते त्याप्रमाणे या ललित गद्यलेखनाची शैली अनुभवाच्या सखोलतेला पेलून धरणारी आहे. गौतम बुद्धाने साक्षात्कारानंतर 'गहकूटं विसङ्गितम्' म्हटले होते. घर तुटले, फुटले, आपण मुक्त झालो, जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटलो म्हणून आनंद व्यक्त केला होता. तो आनंद इथे नाही. इथे आहे काळोख, जो त्या कोवळ्या प्रकाशाने दुभंगलेला आणि अधिक गडद झालेला. त्याचे दुःख. घर कधीच सुटले आता घराची प्रतिमाही उध्वस्त झाली. एका वेगळ्या अर्थाने कलावंत विश्वाशी जोडला जातो खरा, पण आभाळाचे छप्पर असणाऱ्या घराच्या विशालतेत जे साधेसुधे संवेदनाशिल्प इतरांना जपता येते तेही भंगले, त्याचे दुःख आहे. यामधील प्रत्यय अध्यात्म क्षेत्रातील ज्ञानी माणसाचा नाही तर उत्कटपणे जगू पाहणाऱ्या, आवेगात स्वतःला झोकून देणाऱ्या कलावंत मनाचा आहे.

"माझी जीवनाकडून एवढी मोठी आध्यात्मिक अपेक्षा नव्हती. तृष्णा, वासना, इच्छा, संस्कार मनाला चिकटून आहेतच व ते आहेत म्हणूनच एक घरही मला हवे होते. मला ह्या कुठल्याही गोष्टींपासून मुक्ती नको होती. जे घर होते असे वाटले त्याचा सहवास प्रत्यक्षापेक्षा कल्पनेतच जास्त आला. पण त्यालाही इतके दिवस स्वप्नात जखडून ठेवून त्याचा आज अखेर निरोप घेतला. माझेही घर मोडले. पण मला आनंद नाही झाला सिद्धार्थ गौतमा!"

हे ललित गद्य येथेच संपत नाही. घराची प्रतिमा विस्तारत विस्तारत मानवी जीवनप्रेरणेचे दर्शन घडवते, मायाममता मूर्त करते आणि शेवटी गगनाच्या गाभाऱ्यात शिरून जीवाशिवाच्या संबंधात विस्तारणाऱ्या गहन गूढ भावविश्वाला अलगद स्पर्श करते.

"एकाएकी आभाळ भरून आले व दिशा धुंद काळोखून गेल्या. क्षणभरात वादळ सुटले व जोराची वृष्टी सुरू झाली. वादळाचा व पावसाचा आवेग इतका अनावर होता की हातभरावरचे दिसेना..... दहापंधराच मिनिटात वादळ थांबले. पाऊस ओसरला. दिशा उजळल्या. आम्ही पुढे निघालो. जागोजाग लहानमोठ्या झाडांची कलेवरे पडलेली दिसत होती, व नाले खळाळून वाहत होते. मग एकाएकी लख्ख सूर्यप्रकाश पडला व वादळपाऊस झाल्याचे आपल्या गावीच नाही असा आविर्भाव आणून आकाश भावडे नितळनिळे दिसू लागले. वाटले, आता हेच आपले घर, ही जमीन व हे आकाश वादळपाऊस ओतणारे, उन्हाची आग ओकणारे, रात्री चांदणे शिंपणारे, निळाईने गहिरे झालेले आकाश, हेच आपल्या माथ्यावरचे छप्पर आता. ते कधी तुटणार नाही की भंगणार नाही."

यामध्ये महत्त्वाचा आहे तो मनाचा प्रवास. वादळाचा निःस्तब्ध अनुभव घेऊन मनही स्वच्छ झाले आहे. सगळे मलीन वाहून गेले आहे. आता घराची मुठीची कल्पनाच आभाळभर पसरल्याचे नवे आकलन मनात जन्माला आलेले आहे. या शैलीत प्रकट आणि प्रच्छन्न दोन्ही रूपे प्रकटलेली आहेत. शैलीविचारात संस्कृतीचे संदर्भ अतिशय महत्त्वाचे असतात. एक विलक्षण कलासमृद्ध आणि चिंतनशील व्यक्तिमत्त्व

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एलकुंचवारांच्या ललितगद्यामागे उभे आहे. त्यातील अंतर्मुखता, 'मी'चा सतत शोध, भाषेतील प्रतिमाशीलता व काव्यमयता ही त्या व्यक्तिमत्त्वाच्या आत्मशोधी जाणिवेतूनच प्रकटलेली आहेत. उघड आहे की लेखकाला सापडलेल्या केंद्रस्थानच्या अनुभवाभोवती त्याचे इतर भोगलेले, वाचलेले, पाहिलेले अनुभव असे काही गोळा होतात की ज्या मांडणीतही प्रतिमात्मकताच असते. एक स्वयंभू, स्वतंत्र कलाकृती ठरावी अशाच अनुभवांना निवडताना आणि मांडताना तो सतत त्या अनुभवांना पुन्हा पुन्हा न्याहाळत असतो, पडताळत असतो. त्याचे रूप असे वेधक बनते कारण त्या अनुभवांमध्ये आत्मशोधाची आंतरिक सुसंगती असते. त्यामुळे तो अनुभव, त्याच्या भोवतालचे वास्तव, कलावंताचे माणूसपण यांचे एक वेगळे रसायन तयार होते.

दामिएचे चित्र असो, वास्तवात भेटलेली एखादी व्यक्ती असो, घटना असो, 'अपराजितो'सारखा चित्रपट असो की वैयक्तिक, खाजगी अनुभव, ते एक निमित्त बनते. त्यातून चालवलेल्या आत्मशोधाचे, गवसलेल्या आत्मभानाचे आणि अवचित भेटीस आलेल्या विलक्षण आत्मसाक्षात्काराचे त्या कलावंत मनाचे विभ्रम सतत आपल्यापुढे येत असतात. त्यात एकतेत बहुपेडीपण सामावलेले असते, तर कधी व्यामिश्रतेत विलक्षण एकतेचा प्रत्यय येत असतो. या सगळ्यामागे असणाऱ्या प्रतिभेच्या कलात्मक संस्कारातून या निर्मितीचे यश ठरते. कलावंताच्या निवडीत त्याचा कंद ठरत असतो. कारण प्रत्येक अनुभव हा त्या व्यक्तिमत्त्वाच्या अमृतसरोवरात बुचकळल्या जाऊन नवीन होत असतो. त्यामुळे वास्तवाला स्वप्नाचे व स्वप्नाला वास्तवाचे रूप प्राप्त होऊ शकते. कलावंताची अतिविशिष्ट अशी अंतर्मुखता त्या अनुभवाला वास्तवापासून दूरच्या पातळीवर घेऊन जात असते. अशा विश्वात निखळ सामाजिक संदर्भ उपरा ठरतो. संदर्भ असतात ते व्यक्तीच्या संस्कृतिभानाचे. त्यात सौंदर्य, आदर्श, वास्तव सारेच एका पातळीवर आलेले असतात. शैली या शब्दाच्या कलात्म द्रव्यावर कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाची मोहोर लावून प्रतिभावंत प्रतिमा घडवीत असते.

"मी खाली डोळे वळवले व ठिपक्याएवढी असंख्य माणसे मला वळवळताना दिसली. त्या माणसांच्या पलीकडेच अमर्याद समुद्र पसरला होता, पण त्याकडे त्यांचे लक्षही नव्हते. ती आपल्याच किरट्या व्यवहारात मग्न होती व आपली वीतभर जीवने अधाशीपणाने भोगून घेत होती. आणि माझे तरी लक्ष त्या माणसांकडेच होते. त्यांचा क्षुद्रपणा, जीवनातल्या अर्थहीन व्यवहारावरचे त्यांचे प्रेम आणि त्या प्रेमालाच ओल्या मासासारखी चिकटून असलेली त्यांची हावरी जीवनेच्छा - सगळे त्या उंचावरून मला स्पष्ट जाणवत होते."

इथे भाषिक रूप तर आकर्षक आहेच पण जे निर्मावयाचे आहे त्याचा एकात्म प्रतिमामय असा जो बंध आपल्यापुढे विशिष्ट शब्दांनी, आघातांनी उमटतो तो लक्षणीय आहे. भाषारूपाच्या मागील अनुभवाकार रसिकही प्रतिभावळानेच जाणत असतो. यांत्रिक संस्कृतीने आणलेले मानवी जीवनाचे 'किडे'पण, त्यातील त्यांचे सरपटत जगणे विशिष्ट शब्दांनी एलकुंचवार व्यक्त करतात. वास्तविक आपणही त्यावेगळे नाही ही जाणीव पक्की आहे, पण वरून ही गर्दी न्याहाळताना जगण्याची 'उगीचता' त्यांना आधीच स्पष्टपणे जाणवते. शैलीमधील आत्मशोधाची भावना लक्षात आली नाही तर तीमधील सामर्थ्य रसिकाला कळणे अशक्य आहे.

एलकुंचवारांचे दुसरे सामर्थ्य म्हणजे त्यांची शैली वाचकाचे आधीचे आंतरविश्व ती मोडून टाकते आणि नव्याने त्या अनुभवाकडे पाहण्याची नवी शक्ती देते. शैली म्हणजे केवळ भाषायोजना नव्हे, तर ती लेखकाची अनुभव घेण्याची पद्धती आहे. त्यामध्ये अनुभवातील विरोधलय टिपली जाते.

"हाती आलेले एक हाड, भंगून जळून शुभ्र झालेले, त्याच्या फटीतून एक हिरवाकंच कोंभ लसलसत आलेला होता.... तीन दिवस धगधगत राहिलेल्या चितेत हा हिरवा कोंभ कुठून आला? नष्टप्राण झालेल्या, जाळून राख झालेल्या देहात जीवनरसाची ही खूण वाढली ती कशी?"

मरण आणि जीवन यातील अनुबंध ही ह्या लेखनातील केंद्रवर्ती जाणीव आहे. गुंतागुंतीची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनाकलनीय शक्ती आणि त्यामुळे माणसाला जाणवणारे थिटेपण व त्याहीपेक्षा जीवनसातत्याचा साक्षात्कार हा इथे टिपला गेलेला आहे. गुंतागुंतीचे असंगत, विपरीत, परके अनुभव प्रश्न उभे करतात; त्याला तर्कातीत उत्तरे देण्याचा प्रयत्न एलकुंचवार करीत नाहीत तर त्या अनुभवांनाच मूर्त करतात.

वैशिष्ट्यपूर्ण शब्दक्रमाने एलकुंचवार आपल्यापुढे अर्थाच्या पायऱ्याच उभ्या करतात. इथे तर्क किंवा व्याकरण महत्त्वाचे नसते तर अनुभवांची संघटना उलगडणे महत्त्वाचे असते.

"एखादे स्वप्न गोठून तसेच राहावे तसे ते घर व **अवतीभवतीचा** परिसर अडतीस वर्षे जणू माझी वाट पाहत होता. **अवतीभवती** कोणी नव्हते, तळ्यातल्या प्रतिबिंबासारखे ते दृश्य **शांत, स्तब्ध, स्वप्नवत** वाटत होते." जाणिवांना उत्कट करण्यासाठी गद्यातही पद्याची लय निर्माण झालेली आहे, त्यातील आवर्तनेही तशीच आहेत.

"..... ही वाट दुसऱ्या कुणी नियम घालून दिलेली नसते, की आखून दरडावलेली नसते. ही कलावंत स्वतःची स्वतः शोधतो. निदान शोधण्याचा प्रयत्न करीत राहतो. कारण अशी वाट असते, पण ती सर्वांनाच सापडते असे नाही. शिवाय पाऊल पडेल तिथे वाट निर्माण होईल अशा प्रतिभेचे कलावंत थोडेच असतात. शतकानुशतकात एखादाच. पण रिंगणातल्या आकर्षक वाटेला विन्मुख होणाऱ्याला ही वाट शोधावीच लागते व ह्या शोधाला एकदा लागले की मग मागेही पाहता येत नाही, की मागे फिरताही येत नाही."

अंतर्मनातील प्रेरणांनी अकृत्रिम असे आकार धारण केले आहेत असे जाणवत राहते. जाणिवांच्या अपरिहार्य गरजेतून शब्द प्रकटत राहतात.

कधी कधी ही शैली मूळ अनुभवाचेच पुनर्दर्शन घडविताना दिसते.

"एखाद्या गूढासारखी ती अवचित यायची आणि अदृश्य व्हायची आणि ह्या गूढाला रोमांचकारी करणारे अनिंद्य सौंदर्यही तिच्याजवळ होते. गायिका म्हणून तर ती चांगली होतीच पण ज्या रूपयौवनाच्या हाटात ती उभी होती तिथे तिच्या रूपावरच छैले पतंगासारखी झडप घालीत. तिच्या कानातले धक्धक् करणारे हिरे तिच्या रूपाची झळाळी आणखीच वाढवीत." इथे रूपयौवनाचा 'हाट' आहे, भोवताली 'छैले' आहेत आणि हिरेही 'धकधक' करणारे आहेत. तिच्या गायनातील शब्दांच्याच साह्याने लेखकाला येणारा मूळ अनुभव जणू समूर्त होत आहे. इथे प्रतिमासृष्टी अनुभवसंश्लेषणातून फुललेली आहे. त्यामुळे भाववृत्तीचे सारे कंगोरे स्पष्ट होत जातात. अनुभूतीची प्रसरणशीलताच जणू प्रतिमांची रूपे घेते.

"कुठेतरी प्रकाशाची ठिणगी चमकून गेलीसे वाटले..... तो काजवा होता. फार निराशून मी त्या काजव्याच्या चमकण्यामधला अंधार मोजू लागलो. आणि अवचित कुठून तरी दुसरा काजवा पहिल्याला येऊन मिळाला नि चमकू लागला. काही क्षण जात नाहीत तोच दोनाचे चार, चाराचे चारशे. अगणित काजवे तिथे केव्हा लखलखू लागले कळेना सुद्धा. थक्क होऊन ते अद्भुत मी पाहात होतो. ज्या झाडावर ते काजवे लखलखत होते ते झाड रत्नदीपांनी चमकणाऱ्या झुंबरासारखे दिसत होते. काही काळ गेला व हळूहळू काजवे आले तसे निघून गेले आणि दुभंगलेल्या पाण्याने क्षणार्धात एक व्हावे तसा अंधार सांधून गेला."

आशा-निराशेच्या खेळातील या अनुभवाचा ताजेपणा, त्यामागील उत्कट तीव्रता, विलक्षण प्रतिसाद निर्माण करण्याची शक्ती आणि साक्षात्कारी वृत्ती विलक्षण विलोभनीय आहे. त्यामुळे प्रतिमाही संमिश्र संवेदनांनी युक्त आहेत; एकेरीपण प्रतिमेत कधी नसतेच, पण संवेदनांचे वेगवेगळे पाझर त्यांना संपृक्तता बहाल करीत असतात. 'गहकूटं विराङ्गितम 'मध्ये बालपणीच्या आठवणी, स्पर्शसंवेदना, दृकसंवेदना, श्रवणसंवेदना यांनी एकाच वेळी भारलेल्या आहेत.

"मी मागल्या दाराने शिरून आधी स्वयंपाकघराशी आलो. त्याच्या भिंती वाढवून ते थोडे मोठे केलेले दिसले. इथे एक जाळीचे कपाट भिंतीत - त्यात दुधदुभते असे. त्याच्या दारांचा गुळगुळीत ओशट स्पर्श माझ्या हातांना जाणवला. ह्याच्याच समोर देवाचा कोनाडा व जरा पलीकडे चूल. उदवत्ती, कापूर, शिजणारे अन्न व दूधदुभत्याचा संमिश्र गंध स्वयंपाकघरात नेहमी तरंगत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे. तो मला आजही अगदी स्पष्टपणे आला." बालपणच्या आठवणींचा हा गंध, स्पर्श आहे, त्याचेच ते वेगळे दर्शन आहे म्हणून 'नाकाशी दरवळत' येतो तो 'तपकिरी रंगाचा घरगुती खमंग वास'. आईची आठवण अत्तराच्या पेटीशी व आरशाशी जुळलेली असते. तिचे रूप "सोन्याच्या बिलवरामधल्या लालभडक काकणांचा किणकिणाट" लेऊन सामोरे येते.

महेश एलकुंचवार ऐंद्रिय संवेदनांच्या संपृक्ततेतून अनुभवाचे बाह्य रूप मूर्त करून जणू आत आत खोलवर भोवऱ्यासारखे ओढून नेत शैलीतून अनुभवाचे वेगळे असे आंतरदर्शनही घडवितात. घराला भेटण्याचा ध्यास संपला आणि मनात जणू काही दिरेना आता निरोप घेतला, आठवणी काढायच्या नाहीत, मन मागे ठेवायचे नाही. जणू घर संपले. "लग्नानंतर वहिणीला एकदा निरोप दिला की ती आपली असूनसुद्धा आपोआप परकी वाटू लागते असेच काहीतरी मला वाटत होते."

या आत्मशोधात दुसऱ्याचे दुःख समजून घेण्याची धडपड आहे आणि तिला एक स्त्रीदुःखाच्या हळुवार दर्शनाचा रेशमी धागा आहे. दोमिएच्या चित्रातील स्त्रीचे आत वळलेले, अनुभवाचा वडिवार न मांडणारे, उन्ह सोशीत घामाघूम होणारे दुःख; मुजरेवालीच्या दुःखविषयक समजूतीमधील अंतःप्रेरणा जाणवून समंजस, आत्ममग्न व्यथांविषयी वाटणारा विलक्षण भावबंध यातून या कलावंताच्या आत्मभानाला विलक्षण टोकदारपणा लाभलेला आहे. इतक्या वर्षांनी मुलाला दूर करताना आईला जे वाटले असेल त्या अनुभवाचा विलक्षण स्पर्श जाणवतो तो तिच्या आठवणाऱ्या डोळ्यांमधून. लक्षात राहतो तो लगबगीने दार उघडणाऱ्या डोळ्यातील आनंद आणि निरोप देतानाच डोळ्यातील मूक सोशिकपणा. लेखकाचे मन अनुभवू पाहते आहे ते त्याचे हरविलेले तरीही आसमंतात कुठेतरी तरंगत राहिलेले सुखविणारे, दुखविणारे, प्रेमाचे - काळजीचे क्षण! जे अनुभवलेच नाही त्यापेक्षा जे अनुभवले पण भंगले त्या अनुभवांचे रूप मोठे विलक्षण असते. व्याकुळ करणारे, प्राण कासावीस करणारे! मात्र त्यात आता एक स्वीकार आहे, समंजस भान आहे. महेश एलकुंचवारांची नाट्यदृष्टीही त्यामुळे अधिक अथांग, अधिक असीम आणि वाढत जाण्याचे भान जपणारी अशी बनलेली आहे.

नाट्यसृष्टीत धारण केलेल्या तटस्थतेमुळे उत्कट अनुभवांच्या ज्या खुणा शोधणे कठीण असते त्या ललितगद्यात सूक्ष्मपणे तरीही सहज प्रत्ययास येत राहतात. इथे आत्मभान ते आत्मसाक्षात्कार असा आत्मशोधाचा अखंड प्रवास समूर्त होतो. त्यात कलावंताची सजगता असते, त्याचप्रमाणे परिपक्वतेतून येणारे सुजाणपणही असते. इथे या अनुभवांवर कोणत्याही वादाचे - इझमचे लेबल डकवता येत नाही. उरते ते एका लसलसत्या अनुभवलावण्याचे सोलीव दर्शन!

■ ■

डॉ. आशा सावदेकर,
सी-२, अपार्टमेंट्स, १२२, शिवाजीनगर,
नागपूर - ४४० ०१०

संदर्भ

(१) महेश एलकुंचवार, 'माझा आजवरचा नाट्यप्रवास', परिशिष्ट, 'वाडा चिरेबंदी', मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८७, पृ. ८८.
(२) तत्रैव, पृ. ९६.
(३) महेश एलकुंचवार, 'पार्टी', मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८१, पृ. ७४.
(४) महेश एलकुंचवार, 'वाडा चिरेबंदी', उपरोक्त, पृ. ५७-५८.
(५) महेश एलकुंचवार, 'आत्मकथा', मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८९, पृ. ४९.
(६) महेश एलकुंचवार, 'प्रतिबिंब', मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८९, पृ. ६३.
(७) तत्रैव, पृ. ६४.
(८) महेश एलकुंचवार, 'पार्टी', उपरोक्त, पृ. ७६.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ
साहित्य
संघ,
नागपूर.

केंद्रीय कार्यवृत्त
एप्रिल ९५ ते जून ९५.

दि. २ एप्रिल १९९५

महाराष्ट्रात होणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपुरात स्थानांतरित करण्यात यावे. व महाराष्ट्राच्या सर्वच प्रदेशात राज्य मराठी विकास संस्थेची कार्यालये त्वरित सुरू करण्यात यावीत, अशी एकमुखी मागणी वि. सा. संघाच्या कार्यकारिणीच्या नागपूर येथे झालेल्या सभेत करण्यात आली.

याच मागणीवरोबर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी, सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. प्रमोद नवलकर तसेच महसूल मंत्री श्री. सुधीर जोशी यांचे अभिनंदन करण्यात आले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे हे तीनही मंत्री विदर्भ साहित्य संघाचे आजीव सदस्य आहेत.

दि. १५ एप्रिल १९९५

११ एप्रिल रोजी विदर्भ साहित्य संघात सायंकाळी झालेल्या विशेष सभेत माजी पंतप्रधान व देशाचे ज्येष्ठ नेते मोरारजीभाई देसाई यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला. सभेने कै. देसाई यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना आपली श्रद्धांजली वाहिली.

दि. १ मे १९९५

कै. नाना जोग स्मृतिवंदना - विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या हस्ते कै. नाना जोगांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी मनोहर म्हैसाळकर, डॉ. रवीन्द्र शोभणे, योगेश बऱ्हाणपुरे, डॉ. विलास देशपांडे, प्रा. विनोद इंदुरकर व मुकुल खोत ही नाट्यक्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

दि. ३ मे १९९५

दि. ३ मे रोजी सरोजिनी वैद्य यांच्या समवेत लेखकांच्या चर्चेचा कार्यक्रम झाला. या प्रसंगी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी डॉ. सरोजिनी वैद्य यांचे स्वागत केले, तर सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी विदर्भ साहित्य संघाच्या प्रकाशनांचा एक संच त्यांना भेट दिला.

विदर्भ साहित्य संघाने केलेल्या मागणी बाबतचा उल्लेख करून त्या म्हणाल्या की, अद्याप अशी विभागीय कार्यालये स्थापण्याची वेळ आलेली नाही. वि. सा. संघासारख्या प्रादेशिक संस्था याच विभागीय पातळीवर प्रकल्प सुचवून अनेकांना त्याकरिता प्रवृत्त करून राज्य मराठी विकास संस्थेचे विभागीय पातळीवरील कार्य उत्तमरित्या करू शकतील व तसे त्यांनी करावे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यानंतर झालेल्या प्रश्नोत्तराच्या सत्रात डॉ. आशा सावदेकर, डॉ. रवीन्द्र शोभणे, सौ. जयश्री रुईकर, डॉ. विलास देशपांडे, प्रा. सुनंदा देशपांडे, बाळकृष्ण वन्नोरे, केशवराव पोतदार, सौ. सुलभा हेर्लेकर, वसंत वाहोकार, केशव जोशी, सौ. शोभा उवगडे, डॉ. कुंदा केळापुरे इत्यादी मान्यवर लेखक, पत्रकार व विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य या प्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन डॉ. रवीन्द्र शोभणे यांनी केले व आभार प्रदर्शन वसंत वाहोकार यांनी केले.

दि. ८ मे १९९५

८ मे रोजी कवी आ. रा. देशपांडे उर्फ अनिल यांचा स्मृतिदिन विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवी कल्याण इनामदार उपस्थित होते. कवयित्री सुलभा हेर्लेकर व सौ. शोभा उवगडे यांनी कवी अनिलांच्या निवडक कवितांचे वाचन केले.

विदर्भ साहित्य संघाच्या भंडारा येथील ३३ व्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष व वि. सा. संघाचे आजीव सदस्य श्री. जीवनचंद्र राजाराम निर्वाण यांची महाराष्ट्र शासनाच्या दूरसंचार सल्लागार समितीचे सदस्य म्हणून नेमणूक झालेली आहे. श्री. निर्वाण यांचे अभिनंदन !

सरचिटणीस

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

'युगवाणी 'ला पुढील विषयांवर सविस्तर लेख आणि वाङ्मयीन टिपणे हवी आहेत. विदर्भातील आणि विदर्भाबाहेरील अभ्यासकांनी सहकार्य करावे ही नम्र विनंती.

लेख-विषय

१. स्त्रीवादी साहित्य
२. मराठी समीक्षा आणि स्त्रीवादी साहित्य
३. स्त्रीवाद आणि मराठी लेखिका
४. स्त्रीवादी साहित्याच्या आव्हानांचे स्वरूप.
५. वाङ्मयीन महत्ता आणि स्त्रीवादी साहित्य

६. ग्रेस यांची कविता
७. कवी ग्रेस यांची प्रतिमासृष्टी
८. ग्रेस यांचे ललित-बंध

टिपणांचे विषय :

(१) स्त्रीवादी साहित्य आणि ग्रेस या दोन मुख्य विषयांना पूरक होणारा कोणताही विषय, (२) ग्रेस यांच्या कवितेचे अध्यापन, (३) महाविद्यालये आणि मराठीचें शिक्षण, (४) भाषाशास्त्रविषयक प्रश्न, (५) मराठी-संस्कृत, (६) श्रीधर शनवारे, उ. रा. गिरी, नारायण कुळकर्णी कवठेकर, विठ्ठल वाघ, सुलभा हेर्लेकर, श्रद्धा पराते, सुधाकर गायधनी यांची कविता (प्रत्येकावर एक एक स्वतंत्र टिपण अपेक्षित)

संपादक : युगवाणी
द्वारा विदर्भ साहित्य संघ, खांडवेकरांचा बंगला, रामदास पेठ, नागपूर-१०

श्री. माऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
३०३५८
दाखल नोंद क्रमांक
दिनांक ३·३·९८
४६.
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ
विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१.	संशोधन लेखसंग्रह, भाग - २ : कै. हरिभाऊ नेने	रु. ६/-
२.	प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे	रु. ३०/-
३.	मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	रु. ३२/-
४.	अध्यक्षीय भाषणे : रा. भू. तु. ना. काटकर (विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)	रु. ७५/-
५.	आणखी भाषणे : डॉ. मधुकर आष्टीकर	रु. १०/-
६.	तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ : डॉ. र. श. केळकर	रु. ४/-
७.	"प्रातिभ" : लघुकथा संग्रह (१९८७)	रु. २०/-
८.	समग्र वजावा	रु. २०/-
९.	हिंदी मराठी भाषा प्रवेशिका : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ४/-
१०.	ज. के. उपाध्ये यांची १८८३-१९१३ कविता : संपा. आशा सावदेकर	रु. ३०/-
११.	दक्षिणेतील दोन आचार्य : संस्कृततीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	रु. ५/-
१२.	मराठी गद्य : प्रा. श्री. गो. काशीकर	रु. ३/-
१३.	संपूर्ण गडकरी भाग - १ व २ (म. रा. सं. मं.)	रु. ७५/-
१४.	युगवाणी साहित्य सूची : (संपादन : केशव जोशी)	रु. ७०/-
१५.	कविता विदर्भाची : डॉ. सौ. आशा सावदेकर	रु. ५०/-
१६.	छंदशास्त्र : एक अध्ययन : कुंदर दिवाण	रु. १०/-
१७.	वसंत वैभव : डॉ. सौ. कुंदा केळापुरे / डॉ. मदन कुलकर्णी	रु. ८०/-
१८.	धन्यतेची थाप : डॉ. वि. भि. कोलते	रु. १००/-
१९.	वक्ता दशसहस्रेषु (प्रा. राम शेवाळकर) संपादक : डॉ. वि. स. जोग	रु. १२५/-

- १. संमेलन स्थळी एकूण १००/- रु. किंमतीच्या पुस्तकांवर १० टक्के सूट.
- २. शाळा / महाविद्यालय / ग्रंथालये विक्रेत्यांकरिता २५ टक्के सूट.

"युगवाणी" : सभासद वार्षिक वर्गणी रु. ५० /- ■ त्रैवार्षिक वर्गणी रु. १२५/-

युगवाणी जाहिरात दर ::

आवरण पृष्ठ - ४ :	रु. ३०००/-	पूर्ण पान :	रु. १०००/-
आवरण पृष्ठ - ३	रु. २०००/-	अर्ध पान :	रु. ५५०/-
आवरण पृष्ठ - २ :	रु. २०००/-	पाव पान :	रु. ३५०/-

संपर्क : सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीतानर्डी, नागपूर १२. ■ भाष : ५२३९२९

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ